# वऱ्हाडसमाचार.

पु॰तक १४ अकोला, सोमवार तारीख ९ माहे आगष्ट सन १८८० इसवी. अंक ३१

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०२ |

NOTICE TO CONTRIBUTORS.

*We invite the co-operation of all European and Native gentemen in maintaining the status of this journal and to this end solicit contributions in the shape of News letters stray notes &c. Contributors may rest fully assured that the confidence they place in us by sending communications will not be violated.*

## लक्ष्मीसरस्वतीचरित्र.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

मंदाक्रांता.

त्या दुष्टांनीं सहज मथुनी टाकिले भूप सारे।
हिंदुस्थानीं अखिल यवनीं मांडिले हो पसारे
थारा नाहीं सकलहि महीमाजीं आह्मां रहाया
झालों सारे निपट बकरे यातना ही सहाया
॥ ४१ ॥

स्रग्धरा.

गेले अस्ताशि सारे
रवि शशि अमिता तारका आणि तारे ।
हिंदूच्या वैभवाचे;
अखिल महितला व्यापिलें अंधकारें ॥
झाल्या नष्टा सुविद्या
तदुपरि सकला त्या कलाही बुझाल्या ।
शास्त्रें गेलीं लयाला
सुरुचिर कविता भूमिला भार झाल्या ॥ ४२
झाले सारे भिकारी
धनिक जन तयां अन्न नाहीं दुपारीं ।
खाया, वायाचि जाया
निशित विनविती खा विडा खा सुपारी ॥
पोरा कोरा अकोरा
वितभर कपडा तो न वेढावयाला ।
येतां चित्ता सुचिंता
उपजाविति सुता त्या नवोढा वयाला ॥ ४३ ॥

गीति.

ती त्रस्तचित्त झाली
कमला तशि शारदा वदे हाय ॥
दोघींलाही झालें
कीं चरणीं धरणि ठाव दे माय ॥ ४४ ॥
सोडोनि जनपदातें
त्रस्ततुंता जाय काननीं राहे
तापस वेषें आणी
बुधनयनीं वृत्त कां न नीरा हे ॥ ४५ ॥
ती इंदिरा सुचतुरा
जाय पतिवरा करावया तुष्ट
प्रभु मानसास झालें
दोघींचें तुष्टिकर अति वितुष्ट ॥ ४६ ॥

घनाक्षरी.

जाती शतक ते पांच । अरी करी फार जाच
तो तो राहुनी उगाच । सर्व काळ भोगिती
॥ १ ॥
तोषवायास सुल्तान । आति धर्माचा अभिमान
त्यागिती ते बयमान । अंतीं त्यां अधोगती
॥ २ ॥
बारा वरुषें दुष्काळ । पडतांचि रानो माळ
जाती फोडिति कपाळ । केश—भार तोडिती
॥ ३ ॥
कांता सोडिती स्वकांत। बाळां टाकिती वनांत
ऐसा जहाला अकांत । इतीहास वर्णिती ४
॥ ४७ ॥

दिंडी.

अशी सर्वोपरि फार गांजवीतां ।
शरण गेली प्रभुलागिं आर्य माता ॥
दीनवाणी ती वदे भगवंता ।
लाज राखा जी पाहुं नका अंता ॥ ४८ ॥

साक्या.

प्रभुकरुणाघन तृषित चातकी
पाहतांचे पाझरला ॥
देई वर सुप्रसन्न वदनें
ताप तुझा कीं सरला ॥ ४९ ॥
पुनरपि मत्प्रिय कांता नेइल,
अंता दुर्जन सारा ॥
विधिकन्येच्या सहित घेउनी,
भूलोकीं अवतारा ॥ ५० ॥

अभंग.

वरदान माय ॥ संपादितां जाय ॥
वंदुनीया पाय ॥ देवाजीचे ॥ ५१ ॥
पुढें काय मात ॥ वर्तवी अनंत ॥
होऊनी निश्चित ॥ आयकावी ॥ ५२ ॥

( पुढें चालू. )

## पत्रव्यवहार.

या सदरा खालील मजकुर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

शहर इलिचपुर एथून— ता॰ २।८।८०
रा॰ रा॰ वऱ्हाडसमाचार कर्ते यांस :—

वि. वि. आपल्याकडे ह्या खालील चार ओळी पाठविल्या आहेत त्यांचा स्वीकार होऊन येत्या अंकीं छापण्याची कृपा कराल अशी आशा आहे.

भूत चेटक व मंत्र वगैरेविषयीं.

सुमारें दोन महिन्यांची गोष्ट आहे. मी दर्यापुराहून इलिचपुरास येत असतां, मार्गांत पुष्कळ गाव लागले त्यांत वडनेर ( भुजंग ) ह्मणून एक गाव आहे व त्याच्या पुढें एका कोसावर काकडा ह्मणून गाव आहे तेथून पुढें पांच कोस इलिचपुर रहाते. वडनेर भुजंग हें गाव खेडें असून गावाला भोलेश्वरी ह्मणून नदी आहे तिचें पाणी गावांतील सर्व लोक पितात. मी त्या गावांत आलों तेव्हां मला बहिर्दिशेस जाणें भाग पडल्यावरून मी गावापासून ५।६ शेतां पलीकडे नदीकिनाऱ्याजवळ गेलो. नंतर आड मार्गानें शेतांतून चाललों. कारण काकड्यास माझा मामा रहात असतो व त्याचीं शेतेंही त्या नदीजवळच आहेत. त्यांत माझाही हिस्सा आहे. ह्मणून ह्मटलें कीं इकडून परभारें जावें. त्याप्रमाणें नदी ओलांडून जात आहे तों तेथें चार मुलगे व एक तरुण मनुष्य असे पांच जण बाभळीच्या सावलींत गप्पा सांगत बसले होते तेथील प्रकार आपणास कळावा ह्मणून मी सहज जाऊन उभा राहिलों तेव्हां त्यांनीं माझी वमी त्यांची सगळी हकीकत विच्यारितां त्यांनीं सांगितलें कीं हा बाप्या रंभाजी कुणबी काकडेकर आपल्या मुलीच्या साखरपुड्यास आला आहे व आह्मीही काकड्यास असतो. परंतु आह्मी महादाजी मंडंध काकडेकर याचे शेतांत कपासी वेंचण्याकरितां आलों आहो व हा मनुष्य ह्मणतो कीं मी पडत वाघ होतो आह्मी ह्मटलें, नाहीं होववणार. तेव्हां पैज ठरली कीं जर मी वाघ झालों तर १० रुपये घेईन व नाहीं झालों तर २० रु. देईन तेव्हां मीही त्यास पुष्कळ समजाविलें कीं मंत्र वगैरे पृथ्वींत मुळींच नाहींत तेव्हां ही गोष्ट असंभाव्य होय. अशाविषयीं मी पुष्कळ वाचिलें व ऐकिलेंही आहे परंतु कित्येक वृद्ध व तरुण मनुष्यांच्या तोंडून मात्र याविषयीं गोष्टी ऐकिल्या आहेत परंतु त्या खोट्या निःसंशय खोट्या आहेत. तो ह्मणाला तर पहा प्रचीत व नका देऊ रुपये विपये.

नंतर त्यानें सांगितलें कीं, तुह्मी या बाभळीवर बसा व मी जे खडे तुह्मापाशी देईन ते मी वाघ झाल्यावर मला लागलीच फेकून मारा, ह्मणजे मी पूर्ववत होईन. इतकें ह्मणून १४ खडे आणिले व ते भारिले [ मंत्रोपचारिक केले ] त्यांतून सात आमचे जवळ दिले व शिल्लक खड्यांनीं त्यानें आपणाला भारून घेतलें. याप्रमाणें कृति झाल्यावर तो लगेच फुगला व वाघासारखें त्याचें सर्वांग होऊन त्याला लहानसें शेपूट आलें नंतर आह्मी फार भ्यालों व आमचे अंग थरथरां कापूं लागलें. आह्माला कांहींच भान न राहून खडे मारावयाचें सुचलें नाहीं मग तो तसाच क्षणभर उभा राहून व खावयास मिळत नाहींसें जाणून तो उडत चालला. तो दिसेनासा झाल्यावर आह्मी खालीं उतरून कपासी काढणाऱ्या मंडळीस येऊन मिळून सगळा वृत्तांत त्यांस सांगितला.

अस्तमान झाल्यावर आह्मी सगळे घरीं गेलों. व चोहोंकडे एकच बोंब होऊन त्याच्या आई बापांस हा वृत्तांत कळला. त्याचे आई बाप त्याविषयीं फार शोक करूं लागले. तें तुफान आमच्यावर येतच होतें; परंतु ईश्वरकृपेनें आम्ही त्या संकटांतून वांचलों. असो. नंतर त्या गावीं २०।२५ दिवस मुक्काम झाल्या कारणानें त्याच्याविषयीं दोन तीन बोभाटे माझ्या कानीं आले ते हेच कीं, त्याच गावांतील एका तेल्याची सुमारें एक वर्षाची मुलगी त्यानें खाल्ली व ६ मेंढरें खाल्ली आणि वडनेर भुजंग एथील एका बायकोला मारून खाल्लें. याशिवाय आणखीही पुष्कळ जीव जंतू खाल्लें. ही सगळीं रानांत खाल्लीं.

पुढें ८।१५ दिवस गेल्यावर त्याचा बाप शोध करीत निघाला. त्याचा बापही जादुवाला होता. शोध करितां करितां खल्लाळेबी ह्मणून काकड्यापासून ९। १० मैल अंतरावर गाव आहे. त्या गावाच्या जंगलांत एका शेतांत कांहीं मनुष्यें कुंधा काढीत होतीं त्या ठिकाणीं त्याचा बाप आला. व त्यानें त्यांनां हकीकत विचारतां त्यांनीं माहित नाहीं ह्मणून सांगितलें. तेव्हां तो बाप त्यांच्याजवळ पश्चात्ताप पावून ह्मणतो. हरहर! आतां या वनवासी मनुष्यानें कोणीकडे जावें! बरें. असो असें ह्मणून वाघ होण्यासाठी खडे जमा करूं लागला. तेव्हां त्यां मनुष्यांनीं त्याला विचारिलें कीं हे खडे कशाकरितां? तो ह्मणाला मी आपल्या मुलासरखा होतो ह्मणजे दोघे एके ठिकाणीं राहू. इतक्यांत तो वाघही येतांनां त्याच्या दृष्टीस पडला; मग काय विचारावें! त्याचा आनंद त्रैलोक्यांत मावेनासा झाला! नंतर दहा पांच मिनिटांच्या अवकाशांत मंत्र सामर्थ्यकरून त्यानें त्याचा मनुष्य केला. नंतर ते दोघे म्हणजे बापलेक मोठ्यानें कडकडून एकमेकाला भेटले त्यावेळीं सगळा मजकूर त्यानें आपल्या बापास व कुंधा काढणाऱ्या मनुष्यांस सांगितला. शेवटीं तो ह्मणाला कीं मीं पुष्कळ जनावरें व जीवजंतू मारून खाल्ले.

पुढें याचा रिपोर्ट काकडा येथील पाटलाकडे आला व दुसरीकडेही गेला त्यावरून आम्हाला हें वर लिहिलेलें वर्तमान कळलें.

त्याचा बाप बंगाल्यास जाऊन आलेला होता तो म्हणे कीं बंगाल्यांत जादू खरी व फार आहे. यावरून माझी पक्की खातरी झाली कीं आतां भूत, चेटक, मंत्र वगैरे खरे आहेत व ते पृथ्वींत पुष्कळ आहेत असो पुढल्या प्रसंगीं भूत, चेटक यांविषयीं लिहीन.

जी हकिकत आपलेकडे पाठविली आहे, ती मी खुद्द जातीनें पाहिली व मोठ्या खातरीची आहे. तर ही कृपा करून पत्रांत घ्याल व इतर अंकीं ही छापण्याविषयीं आपल्या देशबांधवांस सूचना कराल अशी आशा आहे. हें उदाहरण एकवार तरी लक्ष लावून वाचावें याविषयीं माझी सूचना आहे.

या उदाहरणावरून माझ्या मित्रांची, देशबांधवांची व इंग्रजी शिकून जे विद्वान बनले आहेत, व अशा विषयीं जे नास्तिक आहेत

त्यांची खातरी होऊन त्यांचें नास्तिक्य प्रभंज न होईल कळावें. यांत शुद्धाशुद्ध जें असेल त्याची विद्वज्जनांनीं क्षमा करावी एवढीच विनंती आहे. आतां पत्रविस्तार फार झाला करितां पुरें करितों. तारीख २ आगष्ट सन १८८० इ०

जी. डी. के.


वऱ्हाडसमाचार.

मिति श्रावण शु० ३ शके १८०२


## उमरावती प्रदर्शन.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं, आमच्या उमरावतीच्या सद्गृहस्थांनीं प्रदर्शन करण्याचा विचार काढिला होता त्यास सरकारांतून चांगला आश्रय मिळाला. प्रदर्शनाचें काम फार मोठें व पैशाचें असल्यामुळें सरकारच्या सहाय्याची त्यास फार अवश्यकता होती व तीप्रमाणें सरकारानें मनावर घेतलें हें फार चांगलें झालें. अकोल्यास व नागपुरास सर्व प्रकारच्या पदार्थांचीं प्रदर्शनें लाखो रुपयांचा खर्च होऊन झालीं तसें हें होस नसून शेतकी संबंधापुरतेंच होत आहे, तरी चिंता नाहीं. मंडळीचा उद्देशही इतक्या पुरताच होता. रेसिडेन्सी आर्डरमध्यें या संबंधानें जाहिरनामा-प्रसिद्ध झाला आहे तो असा:—

रेसिडेंट साहेबांचा जाहिरनामा नं० ६९ तारीख २२ जुलाई सन १८८० इसवी— उमरावतीच्या किंत्येक नेटिव गृहस्थांनीं या साल अखेर तेथें शेतकी संबंधी प्रदर्शन करावें असा विचार मनांत आणिला आणि या गोष्टीस कमिशनर साहेब व दुसरे आफिसर यांनीं आपलीं अनुकूल मतें दिलीं त्यावरून रेसिडेंट साहेब खूष होऊन त्यांनीं सदहू प्रदर्शनाचे प्रास्पेक्टस ह्मणजे सूचनापत्रक तयार करावें व अवश्यक तजाविजी कराव्या. या साठीं खालीं लिहिलेल्या गृहस्थांची कमिटी नेमिली आहे.

प्रेसिडेंट.

उमरावतीचे डिपुटी कामिशनर

व्हाइस प्रेसिडेंट.

आर. डब्ल्यू वुडहौस इस्कायर.

मेंबर.

एच एस निकोलेटस इ०

टी एच सिली इ० म्युनिसिपल मेंबर.

सयद फत्ते अलीखान आनररी माजिस्ट्रेट.

मि. वामन अनंत भोळे सुपरवायझर.

,, बाळकृष्ण लक्ष्मण वापट डि. इ. इ.

,, कृष्णराव सखाराम पोलिस इन्स्पेक्टर.

,, यशवंत गोविंद सातारकर प्रमोदसिंधूचे ए.

,, बळवंत व्यंकाजी ग्याडम कपंनीचे क्लार्क.

,, विष्णु मोरेश्वर महाजनी हायस्कू. हे. मा.

,, एकनाथ लक्ष्मण वकील म्युनि. मेंबर

,, रामविलास पोखरणाळ म्युनिसिपल मेंबर.

२ या कमिटीनें कामिशनर साहेबांचे देखरेखी खालीं काम करावें. कमिटीचें कांहीं काम कमिशनर साहेबांस बरोबर वाटलें नाहीं तर त्यांत बदल करण्याचा त्यांस अधिकार आहे.

३ या प्रदर्शनाचा उद्देश मार्गे इतर ठिकाणीं झालेल्या प्रदर्शनासी साम्ना करावा असा नाहीं. फक्त वऱ्हाडांतील व लगत्याचे भागांतील लोकांच्या शेतकीच्या प्रयत्नास उत्तेजन यावें ह्मणून शेतांत होणारी निर्भेळ उपज, शेतीस लागणारे कारागिरीचे जिन्नस, व इतर साठा यांचे मासले एकत्र मिळवावे इतकाच आहे.

या पदार्थांत जे उत्तम ठरतील त्यांस बक्षीस देण्या करितां सरकारांतून १००० रुपयांचें सांगशन केलें आहे. व लोकल फंडांतून आणि दुसऱ्या कोणत्या प्रकारानें आणखी कांहीं रकम देण्या जोगी दिसल्यास देण्यांत येईल. सारांश या कामास लागणाऱ्या एकंदर खर्चाच्या निमेपर्यंत रकम देण्यास सरकार तयार राहील.

४ नेटिव गृहस्थांनीं ही गोष्ट मूळ मनांत आणिली आणि वऱ्हाडच्या नेटिव लोकांकरितांच मुद्दाम हें काम करणें आहे यासाठीं रेसिडेंट साहेबांची अशी सूचना आहे कीं, कमिटींतील नेटिव मेंबरांकडेस च व्यवस्थेचें मुख्य काम ठेवावें; आणि या साठीं सब कामिट्याही नेमाव्या.

या साठीं युरोपियन सरकारी कामदार नेटिव मेंबरांचे वेतबातास चांगले प्रकारें व त्यांच्यानें होईल तितकें सहाय्य देतील व हा हेतु सिद्धीस नेतील अशी रेसिडेंट साहेब इच्छा करून आहेत.

तसेंच या प्रदर्शन कमिटीस सर्व वऱ्हाडांतील डिस्ट्रिक्ट आफिसर वें त्यांचे हाताखालचे कामदार मनःपूर्वक सहाय देतील असा रेसिडेंट सा. भरवसा बाळगतात.

५ मुंबई ब्यांकेच्या उमरावतीच्या शाखेनें या प्रदर्शन संबंधीं खजिनदाराचें काम करण्याचें कबूल केलें आहे. प्रदर्शन कमिटीच्या बतीनें येईल तो पैसा व त्यांच्या सूचनेवरून खर्चास लागेल तो पैसा ही ब्यांक घेत व देत जाईल.

६ ही कमिटी व आणखी नेमाव्या लागतील त्या सबकमिट्या यांनां आपलें काम करण्यास मार्गप्रदर्शक अशा अवश्य वाटतील त्या सूचना कमिशनर सा. यांनीं द्याव्या.

७ कोणत्या जिल्ह्याच्या लोकलफंडांतून किती रकम या प्रदर्शनास दिली पाहिजे तें ठरविण्याचें काम रेसिडेंट साहेबानीं कमिशनर साहेबांवरच सोपविलें आहे.

## काबूल

अयूबखानाची या आठवड्यांत विशेष हालचाल कळली नाहीं. काबुलाहून कंदाहारावर सैन्य रवाना झालें. व आणखी चहोकडून अफगाणिस्थानांत सैन्य जात आहे. काबुलापासून जवळच अकसिराई एथें अमीर अबदुल रहमान फौजेसुद्धां तळ देऊन राहिला आहे. इंग्लिश सरदाराची व त्याची भेट झाली. ब्रिटिश छावणींत तो जाण्यास तयार आहे परंतु त्याचे लोक त्यास अडथळा घालतात तो मजकूर त्यानें सरकारास कळविला आहे. पुढें काय होतें पहावें. दरबारचा बेत तकूब झाला आहे. व अमीर आणि इंग्लिश सरकार यांचे दरम्यान तहनामाहीं अजून झाली नाहीं. बाकी अफगाणांत सर्वत्र स्वस्थता आहे.

(FROM OUR OWN CORRESPONDENT.)

AMRAOTI the 6th August.

Ever since writing my last letter which you published in your issue of a month ago, I have been feeling that I was rather hard on Akola. I now therefore write in a determination to make amends by frankly admitting that there are at Akola many things, and that there exist there many institutions, which are pleasant to the eye and useful to a civilised Public.— The river at Akola with its Anicut and Bridge, the Town Hall, and the New Market are all nice things in the æsthetic sense, and very useful as answering public needs and contributing towards public convenience.— Amraoti by comparison, has none of these and therefore coming from Akola to this place in a change of residence, one misses a great many pleasures, and feels the want of them. In my own case, I remember what a treat it used to be to me, during the monsoon months to go to the Anicut when the river was half high, and sitting on its steps watch the muddy element in a state of seething froth and foam, tear through the openings, and then freed from obstruction, playfully wash and lap the huge black boulders and rocks in the channel below.—Looking into a fire is said to induce thought.—I have often called up all the incidents, painful and pleasant, in a past chequered and varied existence, and have conjured up a thousand probable, and differently tinted futures, while gazing into the waters of the Morna, on the Anicut at Akola.— During the cold season, when the restrained flood rises up as clear as crystal to the very tops of the piers, the long straight reach above, with its turfed banks crowded with densely leaved and evergreen "Babul", whose branches loaded with foliage bend willowlike down into the water itself makes a sight well worth seeing, and only to be seen, to be enjoyed and remembered ever after.— At the time of year I am writing of, this really pretty reach of river, has irresistable seductions for the Oarsman, the Swimmer, the Sportsman, and the Dreamer.— So much for the Anicut and river. I now will say a few words regarding the Town Hall, that at Akola has in the past served so well, all local purposes of entertainment and assembly. This useful, and as a building, ornamental institution, can have no better attestation made of its great public utility, than is contained in the fact that for the want of a like edifice, in Amraoti, demands are frequently and alternately made on the Commissioner's and Deputy Commissioner's Court-Houses, on the High School, and very recently, the Civil Hospital narrowly escaped conversion into a Durbar Hall.

A few words about your new Market Quadrangle and my atonement to Akola will thereafter be complete. The symmetrical ranges of shops combining in their construction simplicity with economic neatness, which make up this quadrangle, will, as soon as they are all finished, present a favorable contrast to the disorderly squalor of the Amraoti market and its surroundings. As apart from my intentions regarding the subject of this letter, but in keeping with the above fact, I may mention that if expenditure were judged by visible results the conclusion would be simply irresistible that the poor but frugal Municipality of Akola, make a Rupee go just four times as far as the comparatively opulent Municipality of Amraoti can, or care to. Here however, I must in fairness allowingly note, that the keeper of the Akola Municipal purse strings, has, for a long period past, been Mr. Dustoor Bymanji Jamaspji C. I. E and every body knows that when this much respected, and universally esteemed gentleman, is making a bargain in public interests, a harder, or a cuter customer to deal with, is not to be found in Western India.— Akola owes much in the way of internal improvement to Mr. Bymanji who is really one of those rare persons gifted with the desire to do good and the determined will and tenacity of purpose necessary to rendering this desire tangible and visible. Berar and Berarees likewise owe much to him for the services he has rendered, and considering the fact that his descent, his family, and his means, quite contradict any possible impression, of his serving for the mere pecuniary recompense he receives; one is forced to the conclusion that if honors and degrees were created to reward and mark Public good well done and done disinterestedly Mr. Bymanji not only deserves all the distinction he has received but merits even more. His age and the wearing effects of the arduous and continuous service he has rendered forbid the realisation of the hope that this service may be prolonged over many future years and I am sure I write correctly that on the part of the population he has done so much good for, and from the Officers of the Provincial Commission, under whom, and with whom, he has worked so faithfully and so cordially, there will be one unanimous wish that some fresh and special act of Sovereign favor which will parti-

cularly distinguish him amongst his people and in the eyes of Her Majesty's subjects throughout Her Indian Empire, will follow, if it does not precede, or accompany, his retirement into well earned private ease.

---

The last *Residency Orders* contain what we were long expecting to see the important notice by the Resident laying down definite instructions for carrying out the project of holding an Agricultural Exhibition at Oomraoti at the end of this year. A Committee of twelve gentlmen with the Deputy Commissioner as President has been appointed to draw up a prospectus and make the necessary arrangements. The object of the Exhibition is not very ambitious being confined to bringing up together the raw products and manufactures of this Province and of the adjoining districts and showing them to the best advantage with the view of encouraging native industry in Berar. The Bresident has very liberally made a grant of Rs. 5000 to be distributed in prizes and has shown his willingness to make further contributions to the fund which the Committee would collect to defray the expenses. The Exhibition has been projected entirely by the Native gentlemen who have now been formed into a Committee and they first received encouragement from our worthy Commissioner Mr. W. B. Jones. Now that the Resident has so liberally extended his support to this useful object the projectors at Oomraoti will no doubt apply themselves with redoubted energies to make the Exhibition as successful as it is posible to be within its prescribed limits. Sub-Committees are to be appointed at all the other stations and we are sure every one of these will heartily cooperate with the principal Committee to accomplish this one of the most useful objects. We anxiously wait to see the prospectus.

---

THE WEATHER—After a break of nearly one month and a half, the rain has at last made its appearance in almost all the districts of Berar. We had a very good fall of rain on the night of the 5th instant and it still continues falling. Had there been no rain during the last week, grain dealers would have raised the rates of grains and the poor would have suffered greatly thereby.

TAKE CARE OF SNAKES—A Musalman, aged about 25, was found lying dead on the road near the Market, on 5th instant. An inquest was held on the deceased's body and a verdict of death by Snake-bite was returned.

---

Lieutt Colonel J. G. Bell has, we hear, resigned the Commandantship of the Berar Volunteer Corps, for the following reason, Viz:—that as he is out camping in the dull seeson, he cannot at tend the drill. This reason may be good one, no doubt; but the Berar Volunteers have certainly lost in him a very good and useful Officer. His successor has not yet been named.

---

Mr. Bomanji Perozsha, solicitor, Bombay High Court, came here in the beginning of this month and we hear he intends staying here for some time.

The Judicial Commissioner Col: J. G. Bell is we learn going to Hyderabad at the end of this week.

---

Mr. E. J. Kitts c. s. Assistant Commissioner has been appointed to undertake the duties of Deputy Superintendent of Census Operations in addition to his other duties as Officiating Judge of Small Cause Court at Oomraoti.

## वऱ्हाड.

पर्जन्याकड लोकांचे डोळे लागले होते व लोकांस मोठी धास्ती पडली होती पण परमेश्वरानें कृपा करून या आठवड्यांत लोकांस आनंदित केलें. गुरुवारीं सायंकाळपासून मध्यान्ह रात्रींपर्यंत चांगला पाऊस पडला व त्यावर शनिवारींही बराच पडला. तेणेंकरून पेरण्याचीं कामें झपाट्यानें सुरू आहेत. वाशिमाकडेही हा पर्जन्य होता असें कळतें.

---

मे० जोन्स साहेब कमिशनर यांची स्वारी गेले आठवड्यांत बुलढाणें डिपुटी कमिशनर आफिसचे तपासणीस गेली होती. व परत येतांना मलकापुर तहशिलीची पाहणी करून उमरावतीस गेली.

---

उमरावतीस नव्या मोहरा पाडून जुन्या ह्मणून विकण्याचे आरोपाबद्दल दोन मनुष्यांस शिक्षा झाल्या. मोहरा पाडणारास ३ महिने कैद व १०० रुपये दंड आणि दलालास १०० रु० दंड.

---

पांच चीफ कानस्टेबल लोकांची परीक्षा झाली. तींत ३ पास झाले. रा. रा. शंकर विठ्ठल संगमनेरकर, मि० महमद बिसामिल्ल व मि० गुलाम महमद.

---

उमरावतीचे म्युनिसिपल सेक्रटरी मि० हेस्कटर साहेबे यांचा पगार २५ रुपये वाढविला.

---

वऱ्हाडांत २।३ असिस्टंट पोलिस सुप्रिंटेंडेंट आणखी नेमणार असल्याचें वर्तमान आहे.

---

वाशिमास जुडिशियल कमिशनर साहेब सेशनास गेले होते ते परत आले. आरोपीवरें अपराध शाबीद न झाल्यामुळें त्यास सोडून दिलें.

---

रा. रा. सदाशिव भास्कर करकरे मेहेकरचे तहशिलीवरून परत आले त्यांस रा. रा. गोविंदराव यशवंतराव दर्यापुरचे तहाशिलदार यांनीं ३ महिन्यांची रजा घेतली सबब त्यांचे जागेवर नेमिल्याचें समजतें.

---

रा. रा. गोविंदराज मुदलियार मोर्शीचे तहाशिल्दार रजा घेऊन मित्रमंडळीस भेटण्याकरितां २ दिवस एथें आले होते.

---

पातुरचे डाक्याचे संबंधांत ९ वणजारी डाकेखोर पोलिस इन्स्पेक्टर मि. स्टिविनसन साहेब यांनीं पकडल्याचें समजतें.

---

बुलढाण्यास खामगावचे साहू शेट नानकराम संतुकराम व इतर यांस अफूचे मुकद्म्यांत शेवटीं ४००० रुपये दंड झाला. अफूच्या नियमांचें स्वरूप आह्मी गेले आठवड्यांत लोकांपुढें ठेविलें आहे. तर वारिष्ठ अधिकारी या गोष्टीचा चांगला विचार करतील असें आह्मी इच्छितों.

---

रा. रा. नारायण रावजी बुलढाण्याचे डेपुटी कमिशनर कचेरींतील कारकून यास दगाबाजी बद्दल २०० रुपये दंड झाला.

---

वाशीम जिल्ह्यातील मोपच्या डाक्यांतलि अपराध्यांस मि० नोलीस साहेब डिंस्ट्रिक्ट माजिस्त्रेट यांनीं सात सात वर्षें कैदेच्या शिक्षा दिल्या.

---

खालीं लिहिलेले तहशिलदारांस दुसरे वर्गाचे माजिस्त्रेटाचा व सन १८७८ चे पहिले आक्टाचे तिसरे कलमांतील अधिकार देण्यात आले.

मलकापुर— रा. रा. त्रिंबकराव यशवंत
दर्यापुर— ,, ,, गोविंदराव यशवंत
मंगरूळ— ,, ,, लक्ष्मण बाळाराम
केळापुर— मि० अबदुल अजीज
मोरशी— रा. रा- गोविंदराज मुदालियार
चिखली— मि० सादत मीरखान
चांदुर— रा. रा- वामन नारायण
अकोट — ,, ,, देवराव जयकृष्ण
दारव्हा— मि० मीर मुबारक अली.
जळगाव— ,, आर्देसर दिनसाजी
बाळापुर— ,, मिरजा सफदरअली बेग
मेहकर— रा. रा. सदाशिव भास्कर
मेळघाट— ,, ,, परशराम गणेश

---

सेंट्रल प्राव्हिन्स व वऱ्हाड यांतील पोस्ट खात्याकडील मुख्यास "चीफ इन्स्पेक्टर आफ पोस्ट आफिसेस" असें ह्मणत होते तें रहित करून या पुढें "डिपुटी पोस्ट मास्तर जनरल" असें ह्मणण्याचा ठराव झाला आहे.

---

मि० महमद यासीन खान साहेब असिस्टंट कमिशनर यांस ता. ११ जुलाई पासून ३ महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

---

उमरावतीच्या कपाशीकडील धर्मादायाची व्यवस्था बरोबर नाहीं. गरिबास पैसे द्यावयाचे ते दरसाल गावांतील सुखी व प्रतिष्ठित लोकांस वतना दाखल दिले जातात. व अंबा सदावर्ताचे हिशेब लोकांस कळत नाहींत व गिरगारिबास त्यांत दाखल करण्यास सर्टिफिकेट लागतें तें गारिबास व त्यांतून आना-न्यास मिळण्याची पंचाईत यामुळें, त्यांस धर्म मिळत नाहीं तर पोलिस खात्यांतील एक दोन नेटिव कामदार व गावांतील संभावित आणि मेहेनती काहीं लोक यांची एक कमेटी नेमून त्यांच्या मार्फत गोरगारिबास अन्न वस्त्र व रहाण्यास स्थळ मिळत मिळण्याची व्यवस्था व्हावी असी प्रमोदसिंधूत सूचना आहे

---

इलिचपुरचे डिपुटी कन्सरवेटर आफ फारेस्ट उमरावतीस आले आहेत व त्यांचें सदर स्टेशनही तेथेंच होण्याचा ठराव झाला आहे.

---

इलिचपुरचे पोलिस सुप्रिंटेंडेंट दोन महिन्यांचे रजेवर गेले होते ते परत येऊन आपले कामावर रुजू झाले. व. मि.

---

मी० नासरउदीन कारंजाचे आणि सयद फत्ते अलीखान उमरावतीचे थर्ड क्लास स्पेशियल माजिस्त्रेट यांस सेकंड क्लासचे अधिकार दिले.

---

मि० महमद रजा आफिशियेटिंग अव्वाची हे हैदराबादेस जाऊन रुजू होऊन उमरावतीस आले.

---

हैदराबाद कंटिजंटचे सहावे कांळे पायदळ पलटण पैकीं असिस्टंट अपाथिकारी डब्ल्यु एँ शेरिफ यांस इलिचपुरास टेंपररी सिविल डाक्टर नेमिलें.

---

मूर्तिजापुरास स्टेशन बाजूलां नवीन वस्ती झालेली जिला मुबारकपुरा ह्मणतात तेथें पोलिस आक्टाचें ३४ वें कलम लागू केलें.

---

रा. रा. श्रीराम भिकाजी जटार इजुकेशनल इन्स्पेक्टर वाशिमच्या शाळा पाहून काल रविवारीं परत आले.

---

मि० हेस्कटर उमरावती म्युनिसिप्यालिटीचे सेक्रटॅरी यानीं मारवाड्यां मुलास छडी मारली त्याजबद्दल २रु. दंड झाला.

---

रा. रा. हरी धोंडदेव भाटवडेकर एथील मिडलक्लास स्कुलांतीलें फर्स्ट असिस्टंट मास्तर रजेवरून परत आले. व रा. रा. महादेव गंगाधर लिमये यांस जळगांव-तालुक्यांत पातुर्डे एथें ५० रुपयांवर पाठविलें. सुमारें दीड वर्ष झालें हे गृहस्थ वेगवेगळे ठिकाणीं थोडे थोडे महिने बदलीवर फिरत आहेत. तेणेंकरून त्यांची मोठी गैरसोय होत असेल हें मनांत आणून डायरेक्टर साहेबे त्यांस कायमची जागा लवकर देतील असें आह्मी इच्छितों.

---

नानाभाई नाटकवाले श्वशुराकडील चोरीचे मुकद्दम्यांत धरले गेले. ते बाळजी मुंबईचे पोलिस माजिस्त्रेटासमोर या अठवड्यांत चौकशीस आणिले. होते. त्यानीं बारिस्टर दिला आहे. थोडा साक्षी पुरावा होऊन बुधवार पर्यंत चौकशी तहकूब राहिली. व उभयतां आरोपीस कैदेंत पाठविलें.

## वर्तमानसार

ता० सिन्नर एथील मामलेदार रा० साहेब रावजी परशराम यांस नगरास मामलेदार नेमल्याचें कळतें.

रा० सा० अनंत आबाजी भोसेकर मामलेदार ता० मावळ यांस सिन्नर एथें मामलेदार नेमिल्याचें समजतें.

मि० गंगाधर अनंत भट एम. ए. एल. सी. ई. आसि. इं. बारामती यांचा वर्ग पुना इरिगेशनकडे झाल्याचें कळतें.

रा. सा. निळकंठ भगवंत मुळे मामलेदार ता. वाळवें यांस हवेली तालुक्याचे मामलेदार नेमणार असें समजतें.

रा. सा. नारायण मोरेश्वर जोग सातारा एथील सरकारी वकील यांस मावळ तालुक्याचे मामलेदार नेमिल्याचें कळतें.

गायन समाजांत जीं मुलें नेक नामदार गव्हरनर साहेब यांच्या बंगल्यावर गेलीं होतीं त्यांच्या आई बापांनीं त्यांस पंचगव्य दिलें असें ऐकतों! टेबलावर मांडलेल्या पदार्थांपैकीं फळफळावळीवांचून दुसऱ्या कांहीं जिनसांस हात लागला कीं काय? किंवा सर रिचर्ड टेंपलच्या कारकीर्दीतील कालेजियन लोकांचा उपदेश घेऊन ती मुलें गेली होतीं?

म्याट्रिक्युलेशनची परीक्षा मुंबई, पुणें, बेळगांव, आमदाबाद व कराची या ठिकाणीं येत्या नोवेंबरच्या पंधराव्या तारखेस सुरू होईल, याच तारखेस एम. ए. व एल. एल. बी. ह्या परीक्षा मुंबईस सुरू होतील. बि. ए. ची परिक्षा ता० २२ सप्टंबर रोजीं सुरू होईल. एफ. सी. व एल. सी. ई. ह्या परीक्षा ता० २२ नोवेंबर रोजीं सुरू होतील. एल. एम. व एस या परीक्षेस ता० २९ नोवेंबर पासून आरंभ होईल.

धुळ्याचे एका मारवाड्यानें चार आण्याचे लोण्यांत ५ रुपये भार लोणी कमी दिलें ह्मणून त्यांस ४० रुपये दंड रा. ब. हु. डे. कलेक्टर यांणीं केला.

मक्कस जो कालवा तयार होत आहे त्याकरितां फक्त मुंबई शहरांत ४०,००० रुपये वर्गणी जमा होऊन सर्व इलाख्यांत २,४८,९०० रु० झाल्याचें कळतें.

कुळें गांव होळकर सरकार विकत घेणार असून त्याबद्दल ८,००,००० रुपयांचें साटें होऊन हद्दी वगैरे कायम करण्याकरितां तिकडचे इंजनेर वगैरे कुल्यास आले आहेत असें समजतें.

कॉनपुर एथें एका सोजराचा लष्करी रीतीनें न्याय चालला असतां त्या सोजरानें न्यायाधिशास सांगितलें कीं, कोळी कातवडी यांच्या कोर्टांत जो मला न्याय मिळेल तितका न्याय तुमच्या पासून मिळणार नाहीं! हें कोर्टाच्या बेअब्रूचें बोलणें ऐकून याच अपराधाकरितां त्या सोजरास सात वर्षे सक्त मजुरीची शिक्षा दिली.

तरुण अपराध्यांस सरकार जन्मपर्यंत काळ्या पाण्याची शिक्षा देतें तें गैर असून अशा अपराध्यांस कांहीं दिवसांनीं परत आणावें ह्मणजे शिक्षेत जे हाल भोगले असतील त्याची हकीकत इतर लोकांस कळविली ह्मणजे त्या धास्तीनें अपराध्यांची संख्या कमी होईल असें एक पत्रकर्ता लिहितो.

श्री० तात्या साहेब सांगलीकर यांस सरकारानें असें विचारलें आहे कीं, तुह्मी आपल्या सर्व दौलतीचा राज्यकारभार स्वतंत्रपणें नियमीत रीतीनें करण्यास तयार आहां किंवा कसें, त्याप्रमाणें श्री० तात्या साहेबांनीं आपण सदरहू दौलतीचें काम स्वतः करण्यास तयार आहों अशी उत्तरी थैली दिल्याचें ऐकतों. हें ऐकून फार समाधान वाटतें.

पुणें. वै.

खिलातच्या खानानीं आमच्या कडून जी मदत होईल ती आह्मी करण्यास तयार आहों असें हिंदुस्थान सरकारास कळविलें व पुष्कळ घोडे व उंट व सामग्री त्यांनीं तावडतोब पाठविली.

प्रयत्नीं परमेश्वर—प्रसिद्ध श्रीधर विठ्ठल दाते यांनीं खटपट करून हैदराबादेस सर सालारजंग यांचे हाताखालीं सेक्रटरीची जागा मिळविल्याची बोलवा आहे.

स्तुत्य उदाहरण— श्री. पंतप्रतिनिधि सं० औंध हे देवास प्रदक्षिणा घालीत असतां सहज तेथें एका साळीच्या अंगास त्यांचा स्पर्श झाला ह्मणून त्यांनीं त्याबद्दल प्रायश्चित्त केलें ह्मणून समजतें. शाबास!

कारण पडल्यास लढाईवर पाठवितां येण्याजोगी फौज जर्मनींत १९ लक्ष तयार आहे. इं. प्र.

सार्वभौम महाराणी साहेबांचे आपत्यांस नेमणुका मिळतात त्यांची यादी.

विक्टोरिया आडिलेड मेरी लुईझा यांचा जन्म तारीख २१ नवंबर १८४० रोजीं झाला. विवाह तारीख २५।१।१८५८ त झाला यांस सालीना ८० हजारांची नेमणूक आहे. यांस ४ पुत्र आणि ४ कन्या आहेत. द्वितीय युवराज प्रिन्स आफ् वेल्स यांचा जन्म ता० ९।११।४१ रोजीं झाला. ता० १०।३।६३ रोजीं अलेकझांड्रिया या राजकुमारीशीं यांचा विवाह झाला. २ पुत्र, ३ कन्या आहेत. सालीना ४ लक्षांची नेमणूक असून, शिवाय कार्नवालचे जाहागिरीचा वसूल मिळतो. पलटणचे हुद्याबद्दलही कांहीं दरमहाची नेमणूक आहे, यांचे पत्नीस दरसाल एक लक्षाची नेमणूक आहे, पण ही कोठून मिळते हें समजत नाहीं. तृतीय एलिसमाडमेरी ग्रांट डचेस आफ् हेसी यांचा जन्म तारीख २१।४।४३ त झाला. दोन पुत्र आणि पांच कन्या आहेत. नेमणूक ६० हजारांची आहे. चतुर्थ आलफ्रेड अर्नेस्ट आलबर्त हे ता. ८।६।४४ रोजीं जन्मले. एडिंबरोचे डयूक आफ् साक्सकोबर्ग गोथा याचे हे वारस आहेत. पंचम हेलिना आगस्टा विक्टोरिया ता. २५।५।४६ रोजीं जन्मल्या. या जर्मनचे राजपुत्रस दिल्या आहेत. यांस ६० हजारांची नेमणूक आहे. षष्ट लुइझा कारोलिना आलबर्टा यांचा जन्म तारीख १८।३।४८ त झाला त्यांस ६० हजारांची नेमणूक आहे. सप्तम आर्थर विलियम पाईक आलबर्ट ता. १।५।५० रोजीं जन्मले. त्यांस अर्ल अफ् ससेक्स ही पदवी आणि डयूक आफ् कानाट ही पदवी अशा दोन पदव्या मिळाल्या आहेत. यांस दीड लाखाची नेमणूक असून लग्न झाल्या दिवसापासून जर्मनचे राजाकडून दरसाल एक लक्ष रुपये मिळतात. अष्टम लियोपोल्ड जार्ज डंकन आल्बर्ट यांचा जन्म ता० ७।४।५३ रोजीं झाला. नेमणूक दीड लक्षाची आहे. नवम ब्रिटिश विक्टोरिया फियोडोर तारीख १४।४।५७ रोजीं जन्मल्या यांचे नेमणुकीबद्दल माहिती मिळाली नाहीं.

ज्ञा. प्र.

पुण्याच्या तुरुंगांतील जन्म ठेपेचे तीन कैदी गवरनर साहेबांनीं सोडून दिल्याचें पुण्याचे वर्तमानपत्रांतून सर्वत्र प्रसिद्ध झाले होते तें खोटें आहे असें टाइम्सवरून कळतें.

महाबळेश्वरास आजपर्यंत ११९ इंच पाऊस पडला.

निजाम सरकारच्या पदरचे मि. फरदुनजी जमशेटजी पार्शी गृहस्थ यांस ग्रेटब्रिटन आणि ऐर्लंड एथील रायल एशियाटिक सोसैटीनें आपले सभेचे मेंबर केलें.

काठेवाडचे तालुकदारांस आणि संस्थानिकांस पोलिटिकल आफिसरानीं असें कळविलें आहे कीं यापुढें आपण आपल्या मुलाचे नांवें जहागिरी तोडून देत जाऊ नये त. फक्त नेमणूक देत जाव्या.

गुदस्त साली हिंदुस्थानचा चीन देशाशी सुताचा व्यापार सुमार एक कोटि रुपयांचा झाला. हा व्यापार दिवसानुदिवस वाढत आहे. १८६९ सालीं ४ लक्ष रु.चा होता.

मुंबई इलाख्यांत होळकर सरकार कनिष्ठ चिरंजिवाकरितां एक गांव खरीद घेणार. अशी टाइम्समध्यें बातमी आहे.

बाबू गोपाळचंद्र मुकरजी यांणीं विक्टोरिया राजसूय'' नावाचा एक ग्रंथ दिल्ली दरबारचे इतिहासाचा लिहिला आहे त्याची एक प्रत चक्रवर्तिनी साहेबास पाठविली व ती त्यांनीं आभारपूर्वक ग्रहण केली असें समजतें.

सिंधपंजाबरेलवेकडे देराडून रेलवे कंपनी नावाची मंडळी होत आहे. तिचे मर्नात ३५ लक्ष रुपये खर्चानें ७९ मैल रेलवे तयार करावी. व भांडवल १०० रुपयांचा शेर करून मिळवावें. व सरकारास मदत मागावी असें आहे,

रूस व चीन या दोन देशांची लढाई सुरू झाल्याची बातमी होती परंतु मध्यस्थीचे योगानें लढाई तकूब होणार असें कळतें. फार चांगलें!

मद्रासेपासून १४ मैलांवर पलकनूथ नावाचें गाव आहे तेथें एक सोन्याची खाण आढळली असून ती तेथील अधिकाऱ्यांनीं पाहून तिजविषयीं सरकारांत लिहिलें आहे.

तुर्कस्थानच्या बादशहानें मांटिनिग्रोचें समाधान तीन आठवड्याच्या आंत करावें अशी एक शेवटची याद तुर्कस्थानच्या बादशहास पाठविण्याचा युरोपांतील प्रमुख राष्ट्रांनीं ठराव केल्याचें तारीख २६ जुलैच्या लंडनच्या तारेवरून समजतें.

चीन देशांतील कांगटंग प्रांतांत अतिशय पर्जन्य पडून नद्यांस प्रचंड पूर येऊन पाणी पसरल्यामुळें पुष्कळ मनुष्यें प्राणास मुकलीं व पिकांचा नाश झाला. तरी लढाईची तयारी झपाट्यानें चालू आहेच!

लंडन शहरांतील एका मोठ्या रस्त्यावर ता. ९ जुलै रोजीं धुराचा नळ फुटला होता तो दुरुस्त केल्यावर तो बरोबर झाला कीं नाहीं तें पहाण्यासाठीं एका मजुरानें दिवा लाविला त्या सरसा धुरानें पेट घेतल्यामुळें तो नळ पुष्कळ ठिकाणीं फुटून मोठा अनर्थ झाला. ह्मणजे तो ज्या रस्त्यांतून आला होता ते रस्ते फाटले आणि सुमारें ४०० घरांस थोडें बहुत नुकसान होऊन दोन मनुष्य तावडतोब मरून पडले आणि २० असामीस दुखापत झाली. ने. ओ.

कांहीं दिवसांपूर्वीं टेलिग्राफ खात्यांतील एक युरोपियन सिग्नलर आगबोटींतून कराचीस जात असतां, आगबोटींतील कामदारांच्या हयगईमुळें त्यास फारच दुखापत झाली व कराचीस जाई तोंपर्यंत औषध उपचार व्हावे तसे झाले नाहींत ह्मणून तो कराचीस गेल्यावर लौकरच मेला. नंतर त्याच्या विधवेनें मुंबईंतील हायकोर्टांत त्या आगबोटीच्या मालकावर नुकसानीबद्दल वीस हजार रुपयांची फिर्याद केली, त्यावर दोंही तर्फेचे पुरावे घेऊन कोर्टानें चवदा हजार रुपये तिला मिळावे असा ठराव केला.

पुण्यांतील सर डेविड सासून आस्पिटलमध्यें प्रसूत होण्याची सोय असण्याकरितां मि. ई. डी सासून यांनीं दहा हजार रुपये बक्षीस दिले असें समजतें. सु. प.


## कृष्णाकुमारी.

शाळांकडील ५व्या पुस्तकांतील कृष्णाकुमारी नावाच्या मनोवेधक गोष्टीवर सातारचे वे० शा० सं० रा० रा० भाऊ दीक्षित यांनीं उत्तम कविता केलेली वऱ्हाडसमाचार छापखान्यांत आह्मी छापिली आहे. किंमत दर प्रतीस ८६ सहा आणे. बाहेर गावीं मागविणारास एक आणा अधिक पडेल.

**खंडेराव बाळाजी फडके.**

## न्यायसार.

( नवीन मासिक पुस्तक. )

हें उमरावतीस प्रमोदसिंधु छापखान्यांत छापत असतें. यांत इंडियन ला रिपोर्टांतील दिवाणी, फौजदारी, धर्मशास्त्र, शरा, प्रमाणशास्त्र, करारशास्त्र व स्टांप, नोंदणी, मुदत वगैरे प्रकरणावरील निवाड्यांचें सार दिलेलें असतें. व वऱ्हाडांतील सर्क्युलरें वगैरे ठराव छापत असतात. याची सालीना किंमत डाक हशिलासह ४८६ आहे. फुटकळ अंकास ८८.

अंताजी गोविंद वकील.


## जाहिरात.

सरकारी नोकरीकरितां लायकीचे सर्टिफिकेट मिळवूं इच्छिणाऱ्या उमेदवारांची परीक्षा सोमवार तारीख १५ माहे नोवेंबर सन १८८० इसवी रोजीं अकोलें व उमरावती एथें हायस्कुलांत होईल. पहिल्या प्रतीच्या सर्टिफिकीटाकरितां ९ व्या इयत्तेंत आणि दुसऱ्या प्रतीच्या सर्टिफिकीटाकरितां ६ व्या इयत्तेंत ( इंग्रजी खेरीज करून ) परीक्षा होईल. उमेदवारांनीं आपले अर्ज हायस्कूलच्या हेडमास्तरांकडे तारीख १ नोवेंबरचे आंत पाठवावे.

मुक्काम अकोला तारीख ५ माहे आगष्ट सन १८८० इसवी.

Narayan Bhai Dandekar
Director of Public Instruction, H. A. D.

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत **खंडेराव बाळाजी फडके** यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४. अकोला, सोमवार तारीख १६ माह आगष्ट सन १८८० इसवी. अंक ३२.

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |

डाक हाशील.

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसांबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०२ |

## NOTICE TO CONTRIBUTORS.

*We invite the co-operation of all European and Native gentemen in maintaining the status of this journal and to this end solicit contributions in the shape of News letters stray notes &c. Contributors may rest fully assured that the confidence they place in us by sending communications will not be violated.*

## कृष्णाकुमारी.

शाळांकडील ५व्या पुस्तकांतील कृष्णाकुमारी नावाच्या मनोवेधक गोष्टीवर सातारचे वे० शा० सं० रा० रा० भाऊ दीक्षित यांनीं उत्तम कविता केलेली वऱ्हाडसमाचार छापखान्यांत आह्मी छापिली आहे. किंमत दर प्रतीस ०६ सहा आणे. बाहेर गावीं मागविणारास एक आणा अधिक पडेल.

खंडेराव बाळाजी फडके.

## लक्ष्मीसरस्वतीचरित्र.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

आर्या.

गंगातीरीं राहे
त्र्यंबकसुत सूर्य--भक्त सूर्याजी ॥
रेणू नामे सति-
पति--सेवेंत सदा निमग्न भार्या-जी ॥ ५३ ॥
रेणूदरांत राहे
ब्रह्म--सुता शारदा सुनवमास ॥
घे 'रामदास' नामें
जगदोद्धारार्थ मनुज--जन्मास ॥ ५४ ॥

स्रग्धरा.

मालोजी भोंसल्याच्या अतिविमल कुलीं
भूषवायास सद्मा !
धन्या व्हाया जिजच्या कुशि तदुपरिं ते
घेइ जन्मास पद्मा ॥
वांटे सुश्रांत झाली सुररिपुमथनी
आदि शक्ती शिवा जी ।
यालागीं हे तदंशें प्रकटुनि बरवें
नाम घेई शिवाजी ॥ ५५ ॥

पृथ्वी.

पुरा करि कुरापती खगरिमा--भरें इंदिरा ।
गमे न उचित स्वयें गमन शारदा-मंदिरा ॥
ह्मणोनि इह जन्मिं तन्मतिस तोषवी ते सती।
शिवाजि गुरुसन्नमा करित रामदासा नती

आर्या.

शिष्याशीं तोचि गुरू
गुरूलाही तोचि शिष्य अनुरूप ॥
न्यूनें न त्या हरीसांहि
येता अरि-करि--विदारणि हुरूप ॥ ५७ ॥
गाधिज मुनि दाशरथी
कीं यदुपति जिष्णुसेच ते गमले ॥
झंझावात अनलसे
जाळाया शत्रु-- कानना नटले ॥ ५८ ॥
दुःख हराया केले
जे जे सदुपाय आर्य जननीचें ॥
त्यांचें निंद्य कराया
लाजावें मात्र हो मनन नीचें ॥ ५९ ॥
ब्रह्मो अथवा एके-
श्वरि पंथाचें न त्यां पिसें जडलें
नसतां असून भार्या
ठेवुनि कर दांभिका परी रडले ॥ ६० ॥
त्यांनां न सार्वजनिका
अथवा अन्या सभा करायाची ॥
युक्ति स्तुति गायाची
सुचली अन्यायमूर्ति रायांची ॥ ६१ ॥
एमे बीये अथवा
बीये एमे हि येफियेऽफेल
नसतां ते तत्कतिल।
कृति यांची पळ न एक लागेल ॥ ६२ ॥
ते 'पावपई' नामक
संचय न कधीं करावया झटले ॥
किंवा हें करूं तें करूं
फोल असे बोल ते न वटवटले ॥ ६३ ॥
न पुनर्विवाह रूपा
खटपट ती वाटली तयां नीट ॥
तैसा न तन्मना ये
पाहुनि अबला निरक्षरा वीट ॥ ६४ ॥
देशी चाकू कातर
धोतर वापर करावया शपथ ॥
स्वप्नींहि ते न घेता,
देशोन्नतिचा न हा खरा सुपथ ॥ ६५ ॥
एवं निषेध रूप
कथिलें तन्मतिस जें न मानवलें ॥
आतां विविध रूपानें
सादर होवोनि आयका नवलें ॥ ६६ ॥

(पुढें चालू.)

वऱ्हाडसमाचार.

मिति श्रावण शु० ११ शके १८०२

## मंत्रानें वाघ हाणें

आमचे गेल्या आठवड्याचे पत्रांत इलिचपुराहून "जी. डी. के." या सहीचें पत्र आलेलें छापलें आहे. त्यांत लिहिलें आहे कीं दर्यापुर व इलिचपुर यांचे दरम्यान काकडा ह्मणून गाव आहे तेथील रंभाजी नावाचा कुणबी मनुष्य वाघ झाला. त्यानें आपल्या ४ सोबत्याजवळ ७ खडे दिले होते व मी वाघ झाल्यावर माझे अंगावर ते खडे टाका ह्मणजे मी पुन्हा मनुष्य होईन असें सांगितलें होतें पण सोबती वाघ पाहून घाबरल्यामुळें त्यानीं खडे टाकिले नाहींत. मग तो वाघ जंगलांत गेला. व त्यानें पुढें एक बायको मारून खाल्ली, एक तेल्याची मुलगी खाल्ली, सहा मेंढरें खाल्लीं, व इतर जीवही कित्येक खाल्ले. त्याचा बापही जादुवाला होता तो त्याचे शोधार्थ निघाला त्यास तीन आठवड्यानंतर खल्लारेंवेशी एथें आपला मुलगा वाघ झालेला दृष्टीस पडला व त्यानें मंत्रानें त्याला मनुष्य केलें. मुलगा दृष्टीस न पडता तर तोही वाघ होऊन जाणार होता इत्यादि मजकूर त्या पत्रांत आहे.

जी. डी. के. आमचे ओळखीचे नाहींत व त्यांनीं आपलें समग्र नावही आह्मांस कळविलें नाहीं. त्यानीं ती हकीकत खुद्द जातीनें पाहिली आहे ती मोठ्या खात्रीची आहे असें ते ह्मणतात. व मंत्राविषयीं नास्तीकबुद्धी धारण करणारे व इंग्लिश शिकून विद्वान झालेले लोक यानीं तिजवर भरवसा ठेवावा व मंत्रश्रद्धालु व्हावें असें ते इच्छितात पण तितका त्यांच्या पत्राचा उपयोग होत नाहीं व होणार नाहीं हें त्यांनां कळविणें आह्मांस भाग झालें आहे. आह्मी स्वतां या मंत्रप्रयोगाचे कामीं अतिशय नास्तिक आहो व आमची खात्री सदर्हू पत्रावरून कांहींच झाली नाहीं, आणि ती गोष्ट खोटी असावी असें आह्मांस वाटतें. जी. डी. यानीं आपलें समग्र नाव व पत्ता आह्मांस लिहिला असता तर आह्मी त्यांस खानगी रीतीनें पत्रें लिहून पुष्कळ खुलासे विचारिले असते नंतर हा अभिप्राय वर्तमानपत्रांत आणिला असता. परंतु त्यांकडून तसें घडलें नाहीं त्यास निरुपाय आहे.

ज्या गावीं वाघाचा पुन्हा मनुष्य झाला तेथील रिपोर्ट काकड्याचे पाटलाकडे आला व दुसरीकडेही गेला असें जी. डी. लिहितात. त्या सरकारी रिपोर्टाची नक्कल मिळवून त्यानीं सोबत पाठविली असती तर बरें झालें असतें. रंभाजी नावाचा कुणबी वाघ झाला असा काकड्याच्या पाटलाचा रिपोर्ट आहे काय ? रंभाजी वाघानेंच मनुष्यें खाल्ली असें खल्लारवेशीच्या रिपोर्टांत आहे काय? रंभाजीच्या बापानें वाघाचा मनुष्य केलेला आह्मी पाहिला असें त्या रिपोर्टांत आहे काय ? याजबद्दल खात्रीलायक खुलासा नाहीं. दुसरें, या गोष्टीस सुमार दोन महिने झाले व आमचे जी. डी. के. इलिचपुर शहरांत रहाणारे तेव्हां त्यांनीं त्या रिपोर्टावर तहशिलदारानीं काय लिहिलें व डिपुटी कमिशनर साहेबानीं त्याबद्दल काय केलें याविषयीं चांगला तपास घेऊन बातमी काढून लिहावयाचें होतें, तसें मुळींच कांहीं केलें नाहीं व हजारो इंग्लिश शिकलेल्या विद्वानांची व मंत्रावर श्रद्धा न ठेवणारांची त्यांच्या मोहगम लिहिण्यानें खात्री होईल असें मानिलें हें बरोबर झालें नाहीं. हा विषय मोठ्या महत्वाचा आहे व त्या विषयीं लाखो लोकांची गैर समजूत काढून टाकावी असें जी. डी. के. यांचे मनांत आहे तर त्यांनीं यांत पुन्हा अधिक लक्ष्य पुरविलें पाहिजे, मूळ रिपोर्ट आह्मी ह्मणतो तसा खुलाशाचा नव्हता ह्मणून प्रकरण जाहिरातींत पडलें, किंवा लेख सर्व खुलाशाचा असून वरच्या कामदारास तो वेडगळ व खोटा वाटला ह्मणून त्यानीं त्यांत बारकाव्यानें मन पुरविलें नाहीं, अगर त्या महत्वाच्या विषयाचा सरकार मार्फत अधिक तपास सुरू आहे व प्रकरण विचारांत आहे असें कांहीं समजलें पाहिजे होतें, तें जी. डी. के. यानीं लोकांस कांहीं समजाविलें नाहीं ह्मणून हें काम अपुरें झालें. तर अजून त्यानीं तपास करावा व लोकांच्या खात्रीस पुढें यावें. त्यांचीही पूर्वीं मंत्रावर श्रद्धा नव्हती पण ही वाघाची गोष्ट प्रत्यक्ष पाहून मंत्राविषयीं त्यांची खात्री झाली असें ते लिहितात त्याप्रमाणें ते आमची स्वतांची व आमच्या कित्येक मित्रांची तशी खात्री करून देतील तर त्यांचे आह्मांवर व साऱ्या हिंदुस्थान देशावर फार उपकार होतील. आह्मी २५ वर्षे मंत्र खरे नाहींत असें ह्मणत आलों व तसें वर्तमानपत्रांतूनही वेळोवेळ प्रसिद्ध करीत आलों पण कोणीही खात्री करून देणारा आह्मांस अजून भेटला नाहीं. तर तें यश जी. डी. यानीं घ्यावें.

आह्मी या लेखावरून असेंही जाहिर करितों कीं सदर्हू वाघ होणारा रंभाजी कुणबी काकडेकर व त्याचा बाप यांस अकोल्यास घेऊन येण्याची अगर आह्माकडे पाठविण्याची जी. डी. के. हे तजवीज करितील. व त्याप्रमाणें ते उभयता बापलेक एथें येऊन आह्मास व आमचे मंडळीस खरोखर वाघ होऊन दाखवितील तर आह्मी त्यांस १०० रुपये बक्षीस देऊ, व जाण्या येण्याचा खर्च देऊ. तर हा मजकूर जी. डी. के. यानीं व इलिचपुरचे आणि दर्यापुरचे स्नेही गृहस्थांनीं काकडा एथील रंभाजी कुणबी व त्याचा बाप यांस अवश्य कळवावा, व त्यांनीं अकोल्यास येण्याविषयीं त्यांचें मन वळवावें.

आमचे जी. डी. के. लवकरच आह्मास भूत चेटकाविषयीं लिहिणार आहेत. तर त्या पूर्वीं त्यानीं एका आरंभिलेल्या या मोठ्या महत्वाच्या विषयाचा आधी उलगडा करून द्यावा व यांत यशस्वी व्हावें, आणि नंतर दुसऱ्या उद्योगास लागावें. तसें केल्यापासून त्यांस अनेक प्रकारचे लाभ होतील.

## कंदाहार.

अयूबखान कंदाहार पासून ६ मैलांवर कोकरन एथें येऊन पोचला. त्याजबरोबर फौज पुष्कळ असून गाजी व इतर गाववाले पुष्कळ आहेत. त्यांत अव्यवस्था मातली आहे. खुशकी नाखुंद एथें ब्रिटिश फौजेतून जी त्याला लूट मिळाली ती वाटून घेण्याचे कामीं हिराती व काबुली लोकांचें बरेंच भांडण झालें व तें मिटवीत असतां अयूबहा त्यांत जखमी झाला असें वर्तमान आहे. अयूबखानानें खुशकी नाखुंदच्या लढाईंत. १२ ब्रिटिश शिपाई धरून नेले आहेत व ते त्या जवळच आहेत असें ह्मणतात पठाण व मुरी लोकांनीं इंग्लिश फौजेचें कांहीं सामान व खजिना जात होता याजवर स्पिनतांगी एथें हल्ला केला व ४ युरोपियन आफिसर आणि शिपाई व मजूर मिळून १०० लोक मारिले आणि सामान व पैसा घेऊन गेले. युरोपियन फौज हल्लीं कंदाहारांत मोठ्या बंदोबस्तानें आहे. बहुत अफगाणी लोक शहर सोडून गेले थोडे व्यापारी राहिले आहेत. जनरल राबर्टस काबुलाहून कंदाहारकडे जावयास ८ वे तारखेस निघाले त्याबरोबर गोरी फौज २८३६ काळी, ७१५१, बुणगे ८०००, घोडे १९७७, तोफखान्याचीं खेचरें ७५० आणि सामान सुमानाचीं जनावरें ७२३५ आहेत. सरदार अजीजखान यास अमीरानें या फौजे बरोबर दिलें आहे. ही फौज कंदाहारास पोंचण्यास तीन आठवडे लागतील. काबुलापासून कंदाहार ३१५ मैल आहे. याप्रमाणें कंदाहारकडील खबर आहे.

काबुलाकडे प्रस्तुत शांतता असून नवीन अमीर अबदुल रहमान तेथें येऊन पोचले आहेत. शिरपुरची छावणी सरकारानीं सोडून दिली ती त्यांनीं स्वाधीन करून घेतली. आतां शहरचा बंदोबस्त ते करीत आहेत. व कामदारांच्या नेमणुका करीत आहेत. इंग्रज सरकारानें ठरावा प्रमाणें च्यार लाख रुपयांचा पहिला हप्ता अमीरास गेल्या मंगळवारी दिला.

सरकारानें काय कारणानें काबुलाकडील आपलें लष्करी ठाणें अगदींच उठविलें याचें कारण एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, फौजेस खर्च फार लागतो, शिवाय अमीर आपले राज्याचा बंदोबस्त स्वपराक्रमानें कसा करितो तें समजलें पाहिजे. तो दुर्बळ असेल व लोकांस त्याहून दुसरा कोणी अमीर करावा असें वाटेल तर ते करतील. इंग्लिश सरकारच्या सर्व शर्ती अबदुल रहमान यानें कबूल केल्यावरून त्याला अमीर केलें आहे. त्याचा तहनामा अजून होणें आहेच.

## रा० रा० कृष्णाजी त्रिंबक रानडे यांचा मृत्यू.

पुण्याच्या ज्ञानप्रकाश पत्राचे मालक रा. रा. कृष्णाजी त्रिंबक रानडे गेले बुधवारीं पुण्यात मरण पावले हें ऐकून आह्मास दुःख वाटतें. कृष्णाजीपंत ह्मणण्यासारखे विद्वान् जरी नव्हते, तरी पोक्त, साधे व मोठे सुस्वभावाचे होते. ज्ञानप्रकाशाचे जन्मदिवसास हेच होते. त्या गोष्टीला आज ३२ वर्षे झालीं; तेव्हां इतक्या जुन्या काळापासून जे छापखान्याच्या धंद्यांत होते व नामांकित पत्राचे मालक होते त्यांच्या मरणानें कोणाही देशहितेच्छूस वाईट वाटल्यावांचून रहाणार नाहीं. ज्ञानप्रकाशाचे पूर्वी मुंबईस प्रभाकर व ज्ञानोदय एवढीच काय तीं दोन पत्रें छापत होतीं. पुढें पुण्यास वर्तमानपत्र असावें असें एका लोकहितेच्छु सद्गृहस्थाच्या मनांत आलें; त्या छापखान्याचा खर्च व वर्तमानपत्राचें काम चालविण्यास ते समर्थ होते. परंतु सरकारी नोकरीमुळें त्यांस पुढें होतां येईना, तेव्हां त्यांनीं मेहनती व हुशार असा एक गृहस्थ निवडून ज्याकडे हें काम दिलें ते गृहस्थ कृष्णाजी त्रिंबक रानडे हे होत. यांनीं त्या गृहस्थांच्या खर्चानें व आपल्या नावानें तीन चार वर्षे छापखाना चालविला नंतर त्यांचें भांडवल फेडून दिलें व आपले मालकीचा छापखाना केला. त्या काळांत लहान सान मजकूर लिहिणें व बातम्या मिळविणें हें काम हे करित असत. पुढें ज्ञानप्रकाशाच्या एडिटरचें काम दुसऱ्या विद्वानांनीं हातीं घेतलें व बदलत बदलत कित्येक गृहस्थ एडिटर झाले तथापि छापखान्याचे मालक आजपर्यंत कृष्णाजीपंत हेच होते. व त्यांचेंच नांव पत्राखालीं चालत होतें.

मध्यंतरी कांहींकाल श्रीमंत मल्हारराव गायकवाड यांच्या त्याशर्तींत हे बडोद्याकडे गेले होते तेव्हां मात्र यांनीं आपलें नाव काढलें होतें. मल्हारराव राज्यपद मिळण्यापूर्वी कैदेंत होते तेव्हां त्यांच्या सुटकेबद्दल सरकारांत अर्ज करण्याचे वगैरे कामीं हे पुष्कळ दिवस झटत होते. पण पुढें ते राज्याभिषिक्त झाले व हे त्यांच्या दरबारीं गेले होते तथापि त्या जाण्याचें विशेष कांहीं फल झालें नाहीं असें दिसतें. कारण ते लवकरच परत येऊन आपले छापखान्याचे धंद्यांत शिरले. कृष्णाजीपंत बहुतांस ठाऊक आहेत. मूळ पुण्याचे वर्तमानपत्र, त्यांतून ज्ञानप्रकाश व त्याचे ते मालक तेव्हां तिकडील बहुतेक लोकांस त्यांची माहिती असणें सहज आहे. यांचें वय सुमार ५५ वर्षांचे असावें. यांनां पुत्र नाहीं. एक बंधु सातारा जिल्ह्यांत विटें एथें रा. रा. विष्णु त्रिंबक रानडे नावाचे चांगले सावकार आहेत. दुसऱ्या त्यांच्या बंधूचे चिरंजीव रा. रा. वामन गोविंद रानडे जे वऱ्हाडांत मास्तर होते, नंतर उमरावतीच्या सत्य प्रकाश पत्राचे एडिटर होते, वे वकील होऊन पुण्यास जाऊन हल्ली कोल्हापुरास वकिली करित असतात ते होत.

## अकोट एथील लायब्ररी व गंगारामसिंग पनजकर

( लिहून आलेला मजकूर. )

अकोट एथील लायब्ररी स्थापन होऊन दहा वर्षे झालीं. ती ज्या जाग्यांत होती, ती जागा अतिशय संकुचित व गैरसोईची असल्यामुळें, व्हावा तसा त्या लायब्ररीपासून लोकांस उपयोग होईना. ही उणीव नाहींशी व्हावी, असें पुष्कळ लोकांच्या मनांत फार दिवसांपासून होतें. परंतु अनुकूल काल आल्याशिवाय कोणत्याही गोष्टीस ऊर्जित दशा प्राप्त होत नाहीं. चालू सालांत वरील लायब्ररीच्या अनिष्ट ग्रहांचीं राशांतरें होऊन मंगलकारक ग्रहांची तिच्यावर दृष्टी पडली तेणेंकरून तिची कुदशा जाऊन तिला अनेक अनुकूल गोष्टींचा लाभ झाला. तिच्या करितां अकोटांतील कोणतीही इमारत ज्याची बरोबरी करूं शकणार नाही असें शोभायमान व सोईचें गृह तयार झालें. खुर्च्या, हंड्या, टेबलें, आलमाऱ्या वगैरे नवीन सामान व अनेक प्रकारची पुस्तकें मिळालीं. लोकांमध्यें तिच्याविषयीं भक्ति उत्पन्न झाली तेणेंकरून आश्रयदात्यांची संख्या वाढत चालली. या सर्व गोष्टीस या तालुक्याचे निष्पक्षपाति, मेहनती, लोक कल्याणेच्छू व लोकप्रिय तहाशिलदार रा. रा. देवराव जयकृष्ण ऊर्फ बाबा साहेब, सार्वजनिक कामा विषयीं अग्रगण्य व यशस्वी असे रा. रा. गबुसिंग यशवंतराव जमादार, व रा. रा. गंगाराम कुसलसिंग रहाणार पनज तालुके अकोट, हे त्रिवर्ग कारणीभूत झाले. बाबा साहेब यांनीं अतिशय झटून घर व सामान तयार करविलें; गबुसिंग यांनीं, गंगारामसिंग यांच्यांत सूक्ष्म रूपानें असणाऱ्या औदार्यांकुरावर आपल्या सदुपदेशोदकाचें सिंचन करून त्याचा वृक्ष बनाविला, व त्याजवर उत्तम फळें आणिलीं व गंगारामसिंग यांनीं इमारतीकरितां ५०० रुपयांची रकम दिली.

लायब्ररी नवीन गृहांत नेण्याचा समारंभ ता. ४ माहे जुलै सन १८८० रविवार रोजीं झाला. समारंभ स्थान कर्दळी स्तंभ तोरणें, फुलांच्या माळा, पताका इत्यादिक मंगलसूचक चिन्हांनीं सुशोभित केलें होतें. बसण्याची उत्तम सोय केली होती. अकोटांतील सभ्य गृहस्थ, शेट सावकार व सरकारी मंडळी मिळून १२५ लोक जमले होते. म्यानेजिंग कमिटीच्या विनंतीवरून दस्तुर एदलजी साहेब असि० कमिशनर, दस्तुर बहिमनजी भाईसाहेब सी. आय. ई. यांचे चिरंजीव यांनीं अध्यक्ष स्थान स्वीकारलें होतें. सर्व मंडळी आपापल्या योग्यस्थानीं बसल्यावर एदलजी साहेब यांनीं थोडेंसें सुरस भाषण करून समारंभाची सुरुवात केली. नंतर सदाशिव गोविंद दामले इं म शाळेचे हेडमास्तर यांनीं समारंभास अनुसरून एक निबंध वाचल्यावर हार, तुरे, विडे, अत्तर गुलाब इत्यादिकांनीं सभापूजन केलें. नंतर सरकारांतून आलेलें खुर्चीचें सर्टिफिकेट गंगारामसिंग यांस एदलजी सा० यांनीं देऊन त्यांच्या गळ्यांत एक फुलांची माळ आपल्या हातानें घातली व आपल्या समोर त्यांस खुर्चीवर बसविलें. आणि सभा विसर्जन झाली. तो दिवस अकोटांत मोठा आनंदाचा होता. त्याच दिवशीं नवीन तयार झालेल्या चावडीचाही प्रवेश समारंभ तिचे मालक पाटील यांनीं उरकून घेतला.

लायब्ररीच्या सामानाकरितां अकोटांतील व आसपासच्या गावांतील गृहस्थांनीं वर्गणी करून ३८८ रुपये जमविले, त्यांचीं नावें व वर्गणीच्या रकमा येणेंप्रमाणें:—

| | |
|---|---|
| मे० रायली ब्रदर्स.... ........... | ५० |
| मि० चिंतामण जानजी पाटील वाईकर | २५ |
| ,, सूर्यभान पाटील मंचनपुरकर .... | २५ |
| रा. सदाराम खेमराज .................. | ११ |
| ,, सदाराम फत्तेलाल. ............ ... | ८ |
| ,, नायनसी जगरामदास. ........ .... | ५ |
| ,, बापुराव देशमुख. ........ ....... | ११ |
| ,, सावतराम रामप्रसाद. .... .... .... | ८ |
| ,, गोविंदराव कृष्ण देशमुख .... .... | १० |
| ,, मारुती गणेश आलसकार ....... | ११ |
| ,, विठ्ठल कृष्ण जोध. ................. | ८ |
| ,, रामराव ठोंबरे. .... .... .... .... | ७ |
| ,, गोकुळदास माधवजी .... .... | १५ |
| ,, लालचंद ओंकारदास. .... .... | ५ |
| ,, शंकरलाल नरसिंगदास. .... .... | ८ |
| मि० फ्लेमिंग साहेब. ... .... .... | २५ |
| ,, बाळाराम परशराम. | ५ |
| रा. परशराम अंबालाल .... | ५ |
| ,, चुणीलाल शिवचंद ......... | ८ |
| ,, मोतीराम कुवरसिंग .... .... .... | ७ |
| ,, नागजी पाटील मंचनपुरकर | २५ |
| ,, गणु पाटील पाथर्डीकर ........ | २५ |
| ,, मारुती पाठील पाथर्डीकर .... | २५ |
| ,, पुंनाजी पाटील कवठेकर. .... | २५ |
| ,, नायनसी लधा .... .... .... | १० |
| ,, पुंजाभाई. ... .... .... | १० |
| ,, गबुसिंग यशवंतराव ........ .... | ११ |

पुण्यास जाहीर सभा:— कै० रा रा. गणेश वासुदेव जोशी यांच्या अकालिक व आकास्मिक मृत्यूमुळें लोकांस दुःख झाल्याबद्दल उद्गार प्रसिद्धपणें प्रदर्शित करून त्यांच्या स्मरणार्थ कांहीं स्मारककृत्य करण्याचा विचार करावा ह्मणून पुण्यास गेल्या रविवारीं तेथील आनंदोद्भव नाटक गृहांत सायंकाळच्या सुमारास जाहीर सभा भरली होती. त्यावेळेस अध्यक्षस्थानीं रा. ब. गोपाळराव हरी यांची योजना झाली. लोकांचा समाज फार मोठा जमला होता. त्या समयीं जमलेल्या पैकीं पुष्कळ गृहस्थांनीं फार चांगलीं भाषणें केलीं व शेवटीं स्मारककृत्य करण्याविषयीं ठराव होऊन फंड जमविण्याकरितां वीस असामीची कमिटी नेमिली. अमुकच प्रकारें स्मारक करावयाचें असें कांहीं ठरले नाहीं. तथापि याचा विचार कमिटीवर सोपविला आहे. तेथें त्या वेळेसच सुमारें दोन हजार रुपयांचे आंकडे पडले असें समजतें. आतां आह्मी इतकेंच ह्मणतों कीं हें काम इतर पुष्कळ कामांप्रमाणें मार्गे न पडतां योग्य रीतीनें शेवटास जावो आणि तें कृत्य सार्वजनिक उपयोगाचें होवो ह्मणजे झालें.

The report on the operations of the Department of Issue of Paper Currency for the year 1878—79 has been published.

The commencement of currency operations began in the year 1862 and the average circulation has been increasing year by year from 441 Lacs to 1319 Lacs, the average circulation in 1878—79.

The value of Home circle notes issued to and received from the public for cash or other notes decreased considerably over that of the previous year.

During the year, 59 Lacs of notes were received and 41 Lacs cancelled and the average value of notes in circulation ranges from

36 in the Calcutta Circle to 131 in the Akola circle.

Akola shows a higher average compared with other circles owing to notes of higher denominations having been in demand towards the close of the year "especially notes of 10,000 Rupees" evidently reqnired for purposes of remittance.

The encashment of Foreign notes had been prohibited in the Allahabad and Lahore circles, and at Nagpur and Karachee, a slight restriction had been enjoined.

The value of notes outstanding has gradually increased from 451 Lacs to 1550 lacs. Notes of the value of Rs 5. and 10,000 were introduced in 1872.

There were 1889 half notes either lost by post or accidentally to the value ef Rs. 92280 paid under indemnity; and 46 whole notes of the value of Rs. 2055 were also paid.

A singular case of erroneous payment is mentioned of the Calcutta currency counter where payment was made on twenty notes in place of ten of 100 Rs. each presented by a sircar of a leading firm in Calcutta. The man was handed over to the Police and the amount paid in excess recovered and the sircar sentenced to 4 month's rigorous imprisonment.

Notes of the Calcutta Circle had been forged very clumsily, six forged notes were detected 3 of Rs. 5 and 3 of Rs. 10 each. At Madras a note of the value of Rs. 100 had been forged and presented for encashment by the bank of Madras and a half note of the Karrachee Circle for Rs. 100 but forging of notes in Bombay has greatly increased and in regard to them the Head Commissioner Mr. Waterfield remarks "a forgery of the old pattern of note, which was discovered in the year under review is evidently the work of that gang of forgers which was broken up in Poona in 1867. Eleven other cases were brought to light, but the imitation is not sufficiently good to call for special remark. The important feature of the year, however is the appearance of 50 Rupee. notes of this circle of the series M 23 and M 35. These notes are sufficiently well executed to pass current without difficulty, and seem to mark a considerable advance on the part of the forgers. I am happy to say that the forger and utterer have been detected since the year closed."

The detection of this forger was facilitated by the great assistance rendered by members of the Berar Police whose names have become famous as detectives.

---

In our previous issues we published some details of the great dacoity at Mope in the Basim District. An incident in connection with that case has now been brought to our notice and it deserves a prominent mention. As soon as it was known that the dacoits entered the village the people turned out with sticks and axes the only weapons they had for offensive or defensive purposes. The ruffians who were about twenty in number were all well armed with swords and firearms and it was not an easy thing for the people to come in contact with them. A Marwadi however bravely rushed forward and caught hold of one of the robbers and though he received two very severe cuts on his breast yet he did not let go his hold. This capture afterwards proved to be a very valuable one as from the information obtained from this prisoner the Police were able to cach six more of the offenders who were all sentenced to long terms of imprisonment. The Marwadi's brave deed deserves a reward and we hope it will not escape the attention of Government.

---

We hear that Mr. Trimbak Rao Yeshwant, Tehsildar of Malkapur has been temporarily appointed an Extra Assistant Commissioner at Akola. We feel rather doubtful whether Sir Richard Meade has thought it fit to consult the Judicial Commissioner in making this appointment. It appears to us that the just and equitable remarks made by the Judicial Commissioner in his annual Administration report for 1878 to the effect that "Mr. Bhaskar Rao, my Clerk of Court, who, I regret to have to state, has been during the year passed over by a junior in the service, is also an excellent officer. I feel that I have inadvertently been the cause of his supersession, and I trust that on the first opportunity my mistake may be rectified" have been entirely lost sight of for reasons as yet unknown to us, but for this supersession of claim of a senior officer we feel exceedingly sorry.

---

## वऱ्हाड.

गेल्या आठवड्यांत पर्जन्य पडून पेरणीचीं कामें झपाट्यानें चाललीं व लोकांचे मनास उत्साह झाला, परंतु या आठवड्यांत पुन्हा पर्जन्यदर्शन मुळींच नाहीं. त्यामुळें नवीन नवीन आलेल्या व येणाऱ्या अंकुरास पोषणार्थ जीवन न मिळून त्यांची स्थिति दुर्बल होत चालली आहे. व किडे वगैरे होऊन बीज खाताहेत तेणेंकरून लोकांस पुन्हा काळजी उत्पन्न झाली आहे. दुसऱ्यानें पेरे होऊन त्यांची ही दशा व पर्जन्याची अशी चलबिचल पाहून पुढील धोरण कांहीं कळत नाहीं यामुळें लोक चिंताग्रस्त आहेत. वऱ्हाडांत बहुत वर्षांत अशी स्थिति कधीं झाली नव्हती असें लोक ह्मणतात. परमेश्वर काय करील तें खरें!

---

आमचे अकोलें एथील गंजांतील प्रसिद्ध साधू श्री हरिचरणबुवा हे अत्यावस्थ आजारी आहेत हें कळविण्यास आह्मांस दुःख वाटतें. त्यांच्या देहाचा आतां भरवसा नाहीं ह्मणून त्यांचे चेले नारायण बुवा यांणीं त्यांची समाधी तयार करण्याविषयीं म्युनिसिप्यालिटीस परवानगी मागितली आहे असें कळतें. या सत्पुरुषाची कोटि अक्कलकोटच्या साधू महाराजांच्याच तोडीची असून यांची प्रख्यातीही या प्रांतांत पुष्कळ आहे त्यामुळें यांची ही स्थिति ऐकून लोक फार हळहळत आहेत. यांची अधिक माहिती आह्मी पुढें लिहू.

---

कर्नल बेल साहेब जुडिशियल कमिशनर शनिवारीं हैदराबादेकडे गेले.

---

मे० जोन्स साहेब वऱ्हाडचे कमिशनर यांची मोठ्या बढतीवर एथून बदली होणार अशी गावांत वदंता निघाली आहे. पण अजून तथ्य कळलें नाहीं.

---

रा. रा. टिकमदास ताराचंद साहू यांचे एथून १००० रुपयांचे दागीने चोरीस गेले त्याचा पत्ता नाहीं.

---

रा. रा. त्रिंबकराव यशवंत मलकापुरचे तहशिलदार यांस अकोल्यास टेंपररी एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर नेमिलें असें समजतें. ते एक दोन दिवसांत एथें येणार आहेत. या हुशार व जुन्या तहशिलदारास ही बढती मिळाली हें पाहून आह्मांस संतोष वाटतो पण यांच्या बरोबरीच्या दर्जाचे व अधिक जुने तसेंच इंग्लिश जाणणारेही एक दोन तहशिलदार असून त्यांकडे वरिष्ठांची नजर कां पुरली नाहीं. व रा. रा. भास्कर सखाराम जयवंत जुडिशियल कमिशनर साहेबांचे क्लार्क आफ धि कोर्ट यास एकस्ट्राची जागा यापुढें सर्वांचे आधीं मिळण्या विषयीं कर्नल बेल साहेब यांनीं मागेंच वार्षिक रिपोर्टांत लिहून ठेविलेलें असून ते ही बाजूस कसे राहिले तें आह्मांस कळत नाहीं.

---

अकोट तालुक्यांत वाघोड्याचे जंगलांत एक मनुष्याचें प्रेत सापडलें आहे व त्याचा कोणी खुन केला असावा असा संशय असून तपास चालू आहे.

---

मि० स्यावियल साहेब पोलिस इन्स्पेक्टर रजेवर होते ते आज आपले कामावर रुजू झाले.

---

फाशीची शिक्षा झालेल्या मूर्तीजापुरच्या शास्त्रीण बाईने रेसिडेंट साहेबाकडे अपील केलें होतें त्याची चौकशी १९ वे तारखेस होणार आहे.

---

मि० हेर साहेब वाशिमचे असिस्टंट कमिशनर यांस एथें आणिलें व मि० फिटझपेट्रिक साहेब एथील एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर यांस वाशिमास पाठविलें.

---

मे० दस्तुर बहिमनजी साहेब सी. आय ई. असिस्टंट कमिशनर यांस पेनशन होणार तें विशेष कारणाच्या नियमाप्रमाणें सालिना सहा हजार रुपये आपणास मिळावे असें त्यानीं सरकारास मागणें केलें आहे असें समजतें. त्यांनीं आजपर्यंत सरकारास दिलेली मदत, त्यांची कामगिरी व योग्यता हीं मनांत आणून मेहेरबानीनें सरकार त्यांचें मागणें कबूल करील व त्याप्रमाणें सरकारानें करावें अशी आमची इच्छा आहे.

---

रा. रा. जयकृष्ण केशव एथील डिपुटी कमिशनर आफिसांतील कारकून यांस बाळापुरास नायब तहशिलदार नेमावें व रा. रा. विठूजी नारायण यांस मागें आणावें असा कमिशनर साहेबांनीं ठराव केला. व त्याची अमलबारी झाली. विठूजीबद्दल आह्मास वाईट वाटतें व त्यांस पूर्वी नेमून पाठविलें तें तसें झालें नसतें तर बरें होतें. लोकवार्ता आहे कीं, ते ब्राह्मण नसल्यामुळें बढती पावले होते, पण त्या वार्तेत कांहीं अर्थ नाहीं. आणि असला तरी कमिशनर साहेब ब्राह्मण व इतर जाति हा भेद कांहीं मनांत वागवीत नाहींत असें स्पष्ट दिसून येऊन आह्मास संतोष वाटतो. जयकृष्णराव यांस नवीन पेशकारास अधिक पगार मिळत असतो तसा मिळेल असें आह्मी इच्छितों.

---

म्युनिसिप्यालिटीच्या व्हाईस प्रेसिडेंटचें व सबा० जज्जानें काम आपणास फार इच्छा आहे असें मे० दस्तुर बहिमनजी साहेब सी. आय. ई. यानीं वरिष्ठास कळविल्याचें ऐकतों.

---

तहशिलदारांच्या बदल्या— रा. रा. हणमंतराव रामचंद्र मेहकरचे तहशिलदार यांस वणीस नेमिलें. वणीचे तहशिलदार रा. रा. शेषाचलम मुदलियार यांस यवतमाळास नेमिलें. यवतमाळचे तहशिलदार रा. रा. अंबादास संतो यांस मेहेकरास नेमिलें. मेळघाटचे तहशिलदार रा. रा. परशराम गणेश दांस मलकापुरास नेमिलें. आणि रा. रा. सदाशिव भास्कर करकरे यास मेळघाटास नेमिलें असें कळतें.

---

रा. रा. चिंतामण मोरेश्वर आपटे रेजिस्ट्रेशन खात्याचे इन्स्पेक्टर हे एथील सब रेजिस्ट्रार यांचे दप्तरची पाहणी करण्याकरितां या आठवड्यांत २।३ दिवस एथें आले होते व ते गुरुवारीं मूर्तिजापुराकडे गेले.

---

तासगावकर नाटकवाल्यांनीं शनिवारीं भ्रांतिकृत चमत्कार हे नाटक केलें. पहिलाच प्रयत्न असून तें बरें साधलें त्यावर ते आणखी अधिक मेहनत करून तो प्रयोग एथील विद्वान मंडळीस पुन्हा एकदा दाखविणार आहेत.

---

अकोल्यास म्युनिसिप्यालिटीकडील भंगी पट्टीचा वसूल बरोबर होत नाहीं. दोन कारकून व दोन शिपाई या कामाकरितां असून ते एकेकाकडे दहा दहा खेपा घालतात तरी कित्येक लोक वसूल देत नाहींत. वाण्याच्या व कापडकऱ्याच्या उचापती प्रमाणें वायदे सांगतात तेणें करून पुष्कळ बाक्या थकल्या आहेत. असाच किंवा याहून अधिक झटला तर चालेल, सोलापुरच्या भंगी पट्टीचा प्रकार झाला आहे. तेथील कल्पतरु-पत्रांत या संबंधानें या आठवड्यांत मजकूर आला आहे तो असा:—

लक्ष पुरवा– भंगीपट्टीचा वसूल करण्याकरितां आमचे म्युनसिप्यालिटीनें वरचेवर इस्टाब्लिशमेंट वाढविलें. मक्ते देऊन पाहिले. कमिशनरांनीं लोकांच्या दारोदार खेपा घातल्या व अखेरीस मे० स्टुवर्ट सा. फ. अ. व कलेक्टर साहेब हेही कांहीं दिवस वसुलाकरितां हिंडले. तरी पण भंगीपट्टीचा वसूल व्हावा तसा होत नाहीं असें पाहून काल रोजीं म्युनसिप्यालिटीचे जनरल कमिटीनें असा ठराव केला कीं, जे लोक भंगीपट्टीचें बिल पोहचल्यापासून ४ दिवसांचे आंत वसूल देणार नाहींत त्या लोकांपासून भंगीपट्टीशिवाय आणखी चार आणे दंड घेतला जाईल व हे सर्व पैसे सक्त रीतीनें वसूल केले जातील असा ठराव केला. इकडे सर्व लोकांनीं लक्ष पुरवावें.

हा प्रकार बराच सक्तीचा आहे, पण उपाय नाहीं. खुद्द कलेक्टर साहेब व म्युनिसिप्यालिटीचे सर्व मेंबर भंगीपट्टीचे वसुलासाठीं लोकांच घरोघर फिरले असतांही वसूल झाला नाहीं मग त्यांनीं काय करावें? आमचे इकडील लोक इतक्या थरावर गोष्ट येऊं देणार नाहींत असें आह्मी इच्छितों. नाहींपेक्षां एथील म्युनिसिप्यालिटीसही कांहीं कडक नियम करावे लागतील.

---

## वर्तमानसार

कलकत्याच्या म्युनिसिप्यालिटीची व्यवस्था बरोबर नाहीं. एके रस्त्यांत पावसाचें पाणी इतकें झालें होतें कीं, बोटी असत्या तर चालल्या असत्या.

निमचपासून चितुरपावेतों आगगाडीचें काम झपाट्यानें चालू आहे. या सालअखेर पुरें होईल.

इंदुराकडे पाऊस नाहीं. अर्धा पावसाळा संपला तरी ५ इंचाहून अधिक पाऊस नाहीं. सरसाल ३५ इंच पडतो. लोक पावसाची वाट पाहून आहेत. निमचकडे आजपर्यंत २० इंच पाऊस पडला, तिकडे पिकें बरीं आहेत.

✓ सोलापुराकडील दुधनीचे रेल्वे इन्स्पेक्टर मि० पोलन यांनीं स्त्रियांच्या मनास लज्जा वाटेल अशा तऱ्हेनें गंगा नावाच्या स्त्रीवर गर्दी केली. तिच्या अंगास स्पर्श करून ओढा ताण केली व तिचें लुगडें फाडिलें या गुन्ह्याबद्दल त्यास ५० रुपये दंड व तो न दिल्यास एक महिना साधी कैद अशी त्यास शिक्षा झाली. गंगाही एका शिपायाची बायको होती.

धुळ्याकडे पाऊस नव्हता तो गेल्या आठवड्यांत थोडा पडला असें वर्तमान आहे.

इंदापुराकडे पर्जन्याचा थेंब नाहीं. लोक उठून चालले आहेत. या सालीं पर्जन्य न पडेल तर त्या तालुक्यांत मनुष्य दृष्टी पडण्याचा संशयच आहे. क० त०

टिकिट घेतल्यावाचून एक मनुष्य आगगाडींतून बसून गेला या गुन्ह्याबद्दल आनररी माजिस्त्रेट श्री० रा. माधवराव विठ्ठल विंचुरकर यांनीं त्याला ३ महिने सक्त मजुरी कैदेची व ५० रुपये दंडाची अशी शिक्षा दिला. हाय कोर्टास ही शिक्षा अधिक वाटून त्यांनीं ३ महिन्यांची कैद कमी करून दोन महिन्यांची केली.

रत्नागिरी जिल्ह्यांत एका विधवेनें जीव दिला- ती चार पांच महिन्याची गरोदर होती.

पुण्याचे रा. रा. त्रिंबकराव नारायण राजमाचीकर यांस आनररी माजिस्त्रेट कल.

विलायती कांहीं झाडांचें बीं गांवोगांव रस्त्याचे बाजूस वगैरे पेरण्यासाठीं मुंबई इलाख्यांत सर्कारचे हुकुम झाले आहेत.

विश्रामबागेच्या जळालेल्या भागावर पुन्हा इमारत बांधण्याचे कामीं पुण्याच्या म्युनिसिपालिटीनें ५००० रुपये देण्याचें कबूल केलें. परंतु त्या इमारतींत लायब्ररीला साय करितील तर ही रकम देणार असा तिचा आक्षेप आहे.

काठेवाडांत पाहिजे तसा नवरा न मिळाल्यामुळें व कोणा मुलींच्या बापास हुंडा देण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें मिळून ४०० मुली मोठमोठाल्या लग्नाच्या शिल्लक आहेत त्यांत एक मुलगी तर ४३ वर्षांची आहे असें कळतें.

कसबिणी स्त्रियांचे संबंधानें उपदंशरोगाचा कायदा मुंबईस लवकरच लागू करणार आहेत. त्या संबंधानें वर्तमान पत्रांतून पुष्कळ वाटाघाट चालू आहे. हा कायदा चालू करण्यानें कांहीं उपयोग न होतां लोकांस विनाकारण फार त्रास होईल असें सर्व ह्मणत आहेत. डाक्टरानीं स्त्रियांची अंतस्थ परीक्षा करावयाची किती वाईट गोष्ट आहे! इं. प्र. त लिहिलें आहे कीं तशा स्त्रियांची कामेच्छा अगदी नष्ट करण्याचें डाक्टरानीं औषध योजावें व सरकारानें त्या स्त्रियांस मोल मजुरीवर लावून पोटास द्यावें असें केले तर बरें होईल.

जंगल खात्याच्या नवीन व्यवस्थेनें लोकांस अतिशय त्रास होत आहे. व सरकारानें या कामाकडे अवश्य लक्ष पोंचविलें पाहिजे याजबद्दल नेटिवओपिनियनमध्यें एक चांगला निबंध प्रसिद्ध झाला आहे. जंगल खात्याकडील अधिकाऱ्याच्या गोड गोड रिपोर्टास सरकार भुलत आहे हें बरें नाहीं. नवीन व्यवस्थेनें इनामदार, जाहागीरदार वगैरेंच्या झाडझाडोऱ्याच्या हक्कास धक्का बसत आहे. लोकांच्या जमीनी सरकारांत चालल्या आहेत. सर्पण मिळण्याची मारामार झाली आहे. फळफळावळीवर गरीब लोक गुजराण करीत होते ते उपाशीं मरूं लागले आहेत तर या गोष्टीचा सरकारानें अवश्य विचार करावा.

मुंबईस पोलिस ग्याझेट नावाचें पत्र काढण्याचा पोलिस कमिशनर यांचा विचार आहे.

सरकारी दप्तर उर्दू भाषेंत असावें असा बहार प्रांताच्या लोकांनीं बंगाल सरकारास अर्ज केला आहे.

सर बार्टल फ्रियर यांस आफ्रिकेंतून माघारी बोलाविलें आहे.

मद्रास इलाख्यांत वैनाद एथें सोन्याच्या खाणी आहेत व तेथें कामें चालू आहेत त्याकरितां बेपुरापासून ह्मैसुरापर्यंत रेल्वे व्हावी असें घाटत आहे.

✓ कलकत्याच्या ब्रिटिश इंडियन असोसियेशन सभेनें मि० फासेट साहेब पार्लमेंटांतील मेंबर यांस त्यांच्या निवडणुकीकरितां जो खर्च झाला तो वर्गणीनें जमवून पाठविला. ६३८० रु. जमले होते. त्यांत हुंडीचा खर्च वजा होऊन ५०७ पौंड त्यांचे हातीं गेले. त्यांनीं असोसियेशनचे आभार मानून उत्तर लिहिलें आहे कीं मी आपला फार उपकारी आहे. आपण मानिता इतकी हिंदुस्थानची सेवा मजकडून घडत नाहीं. तुमचे देशाविषयीं मला जी प्रीती आहे व जो अभिमान आहे तो कदापि कमी होणार नाहीं. आपण रकम पाठविली इतका खर्च मला लागला नाहीं सबब लागला तितका घेऊन बाकी रकम तुमचे इच्छेप्रमाणें फंडांत टाकिली आहे.

नगर जिल्ह्यांत आजवर चांगला पाऊस पडला नाहीं. आतां खरीपाच्या पेरणीचा हंगाम संपला. रब्बीच्या वेळींही असेंच घडेल तर मागच्या पेक्षां प्रसंग भयंकर येईल असें तिकडील पत्रांत लिहिलें आहे

रंपा बंडाची समाप्ती झाली. तिकडे पाठविलेलें सैन्य मद्रासेस परत यावयास निघालें.

मि० राबर्ट सन साहब मुंबई इलाख्यांतील मध्य भागचे कमिशनर रजा घेऊन विलायतेस जाणार व त्यांचे जागेवर मि० क्राफर्ड साहेब दक्षिण भाग कमिशनर यांची नेमणूक होणार.

नगर जिल्ह्यांतील रयतेनें सरकारास अर्ज केला आहे कीं, रयतेच्या बचावासाठीं सरकारानें नवीन आक्ट केला त्यापासून आमचा बचाव न होतां नुकसान होत आहे.

✓ विंचुरकर जहागिरदार यांस पुण्याच्या सार्वजनिक सभेंत तुमचा कोणत्या प्रकारचा संबंध आहे असें विचारिलें आहे ह्मणतात.

हिंदुस्थानांतील सर्व रेल्वे कंपन्यांचे माल नेण्याचे प्रकार एकसारखे नाहींत, ते व्हावे असा प्रश्न इंग्लिश पत्रांतून निघाला आहे. चहा कोणी रेल्वे कंपन्या सेकंड क्लासांत धरितात व कोणी थर्ड क्लासांत. वाइन दारू कोणी तिसरे क्लासांत व कोणी चवथे क्लासांत धरितात. मातीचीं भांडीं जी. आय. पी व बडोदा रेल्वे फर्स्ट क्लासांत धरितात, स्टेट रेल्वे सेकंड क्लासांत धरितात, ईस्ट इंडिया व सिंध पंजाब रेल्वे थर्ड क्लासांत धरितात आणि मद्रास रेल्वे स्पेशियल क्लासांत धरिते. लोकरीचे देशी गालिचे ईस्ट इंडिया व सिंध पंजाब रेल्वे मोठ्या दरांत घालितात आणि दुसऱ्या रेल्वे हलक्या दरांत घालितात. सुताचे देशी गालिचे सर्व रेल्वेंतून सारख्या दरानें धरतात आणि तंबाकू कोठें फर्स्ट, कोठें सेकंड, कोठें थर्ड व कोठें स्पेशियल क्लासांत धरतात. ही अव्यवस्था मोडून सर्वत्र एक प्रकारचे दर व्हावे हें अवश्य आहे. फ्रान्स देशांत हे सर्व दर एकसारखे आहेत असें ह्मणतात-

---

## गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणाचें औषधाच्या डब्या विकावयास आल्या आहेत हे औषध खात्रीचें असून यापासून गुण लवकर येतो. लावतांनां आग मुळींच होत नाहीं. औषध थंड पाण्यांत भिजवून गंधाचे उटीप्रमाणें पातळ करून स्नान केल्यानंतर लावावें. किंमत ८६ आणे.

हें औषध गजकरण शिवाय करून खरूज व नायटे यांजवरही चांगले प्रकारें लागू होतें.

या गजकरणाच्या औषधाच्या डब्या २ वर्षांपूर्वी आमचे छापखान्यांत विक्रीकरितां होत्या व त्यांपासून पुष्कळांस गुणही आला. परंतु अलिकडे सदर्हू औषधाच्या डब्या आमचे जवळ शिल्लक नव्हत्या व तेणेंकरून या रोगानें पीडलेलीं गिऱ्हाइकें परत गेलीं ह्मणून आह्मी त्या औषधाच्या डब्या मुद्दाम आणिल्या आहेत.

---

## न्यायसार.

( नवीन मासिक पुस्तक. )

हें उमरावतीस प्रमोदसिंधु छापखान्यांत छापत असतें. यांत इंडियन ला रिपोर्टांतील दिवाणी, फौजदारी, धर्मशास्त्र, शरा, प्रमाण शास्त्र, करारशास्त्र व स्टांप, नोंदणी, मुदत वगैरे प्रकरणावरील निवाड्यांचें सार दिलेलें असतें. व वऱ्हाडांतील सर्क्युलरें वगैरे ठराव छापत असतात. याची सालीना किंमत डाक हशिलासह ४८६ आहे. फुटकळ अंकास आठ आणे.

अंताजी गोविंद वकील.

---

## नोटिस

दतु कुचर रहाणार मौजे कानसनी प्रगणे कुरणखेड तालुके अकोलें यास रामदेव जगन्नाथ मारवाडी दुकान मौजे देवळी तालुके अकोलें यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आमचें शेत मौजे कानसनी एथील गत वर्षीं तुह्मी बटाईनें केलें होतें त्यापैकीं तुह्माकडे लाख १० मण चार शेरी पायलीची व कुठार डाले ६० इतका माल आमचा तुह्माकडे येणें राहिला तो तुह्मी अजून दिला नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे ही पावल्यापासून ४ दिवसांचे आंत आह्मास द्यावा न दिल्यास चालू भावानें रुपये लावून फिर्याद करून खर्चासुद्धां रुपये भरून घेऊ कळावें. तारीख १३ माहे आगष्ट सन १८८० इसवी.

(सही ) रामदेव जगन्नाथ मारवाडी
दस्तुर जगन्नाथ.

---

## नोटिस.

भद्या साबळ्या रहाणार मौजे कानसनी प्रगणे कुरणखेड तालुके अकोले यांस रामदेव जगन्नाथ मारवाडी दुकान मौजे देवळी तालुके अकोले याजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमचें शेत मौजे एळवण एथील तुह्मी बटाईनें गत वर्षीं वाहिलें त्यांतील आमचे हिशाचा कडबा पेंडी ९०० नऊशें तुह्माकडे राहिला तो तुह्मी अजून दिला नाहीं. तो ही नोटिस पावल्यापासून ४ दिवसांचे आंत सदर्हू कडबा आमचा आह्मांस द्यावा. न दिल्यास दर शेकडा १२ रुपये प्रमाणें हल्लीं भाव चालू आहे त्याप्रमाणें १०८ एकशें आठ रुपये रोख द्यावे. हे न दिल्यास तुह्मावर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून या नोटिशीच्या खर्चा सुद्धां रुपये भरून घेऊं. कळावें तारीख १३ माहे आगष्ट सन १८८० इसवी.

( सही ) रामदेव जगन्नाथ मारवाडी
दस्तुर जगन्नाथ.

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.